बदली ड्रायव्हर पाहिजे?
आता बुक करा – फक्त एका फोनवर!
- सुरक्षित आणि विश्वसनीय
- तुमच्या वेळेनुसार उपलब्ध
CONVINIO
9422727899
KYC Verified, Police Verified
200 Drivers at Ahilyanagar

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १९.१२.२०२५ | अंक नं. २१६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

फायदाच फायदा!
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
2014 पासुन आपल्या सेवेत..सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

OPEN TOMORROW
नवीन पिढीसाठी आधुनिक लूक आणि क्लासिक सौंदर्य.
अहिल्यानगर सर्वोत्तम दागिन्यांचे प्रदर्शन
Gehena
A Premium Jewellery Exhibition
20-21 डिसेंबर, 2025
आयरिस हॉटेल अहिल्यानगर
वेळ : सकाळी १०:३० ते रात्री ८:३०
98923 98360

एक अगरबत्तीचा सुवास दरवळेल दूरवर....
प्रिमियम मसाला अगरबत्ती इंडियन कस्तुरी
इंडियन कस्तुरी म्हणजे असली कस्तुरी
४५ ग्रॅम व २५० ग्रॅम मध्ये सर्वत्र उपलब्ध
तसेच केशरचंदन, शाहीऊद, हिना कस्तुरी, महालक्ष्मी, कस्तुरीचंदन अगरबत्ती व धुप
अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
केवळ अगरबत्ती
हॉटेल ससाणे समोर, आडते बाजार, अहमदनगर. फोन : २३५८०५०

दर्जेदार व माफक दरात
फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

आरोग्यसदन हॉस्पिटल
डॉ. प्रशांत काळे
DNB ऑर्थोपेडिक सर्जन जॉईन्ट रिप्लेसमेंट स्पेशालिस्ट
आधुनिक अस्थिरोग व सांधेदुखी उपचार केंद्र आता आहिल्यानगरमध्ये
– उपलब्ध सुविधा –
* सांधेदुखी व जॉईन्ट रिप्लेसमेंट सर्जरी
* स्कोपी सर्जरी
* फ्रॅक्चर व ट्रॉमा सर्जरी
* मणक्यांचे ऑपरेशन
* ऑपरेशन नंतर फिजिओथेरपी व पुनर्वसन सुविधा
24/7 आपत्कालीन सेवा
पत्ता : नगर-मनमाड रोड, सावेडी नाका, सावेडी, अ.नगर संपर्क : 8981008008

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

अर्हम विज्जा फाउंडेशन अहिल्यानगर और अहिल्यानगर एज्युकेशन सोसायटी इनके संयुक्त सहभाग से
Arham Vijja
विश्व ध्यान दिवस
के अवसरपर विशेष ध्यान सत्र
SKIP THE SCROLL, REACH THE GOAL
दिनांक : 21 दिसंबर 2025
समय : सुबह 6.45 बजे
कार्यक्रम की विशेषता :
* संगीतमय वार्मअप/झुंबा
* ध्यान का सहज सुंदर प्रभावकारी प्रयोग
* मेडिटेशन कार्ड्स द्वारा सहभागी अपने घरमे ध्यान कर सकते है
* प.पू.श्री प्रवीणऋषिजी म.सा.का सहभागीयों को LIVE मार्गदर्शन
रजिस्ट्रेशन के लिए स्कॅन करें
स्पॉट रजिस्ट्रेशन उपलब्ध है
सन्माननीय अतिथी :
मा. श्री. सोमनाथजी घार्गे पोलिस अधिक्षक
मा. श्रीमती छायाताई फिरोदिया
मा. श्री. बाबुशेठजी बोरा
मा. श्री. आदेशजी चंगेडिया
सुत्र संचालक : मा. श्री. प्रसाद बेडेकर सर
प्रायोजक
चंदुकाका ज्वेलर्स
शरद मुथा हौसिंग डेव्हलपमेंट लि.
स्थान : मोने कला मंदिर, भाऊसाहेब फिरोदिया हाईस्कूल, माळीवाडा, अहिल्यानगर.
9270227070

## नगर जिल्ह्यात फायनान्स कंपनीची ४ कोटी ३ लाख रुपयांची फसवणूक

### मोठा कर्ज घोटाळा उघडकीस, ४ सेल्स एक्झिक्युटिव्हसह ६५ कर्जदारांवर गुन्हा दाखल

नगर – ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी एल अ‍ॅण्ड टी फायनान्स कंपनी कडून ६५ जणांनी सुमारे ४ कोटी ३ लाख ४० हजार ४७५ रुपयांचे कर्ज घेतले. या कर्ज रकमेतून ट्रॅक्टरही खरेदी केले, मात्र गेल्या दीड दोन वर्षात यातील एकाही कर्जदाराने एकही कर्जाचा हप्ता भरला नाही. कंपनीने केलेल्या चौकशीत कंपनीच्या ४ सेल्स एक्झिक्युटिव्ह यांनी या कर्जदारांशी संगनमत करून त्यांचे बोगस पत्ते व इतर बोगस कागदपत्रांच्या फाईल बनवून त्या खऱ्या आहेत असे भासवून ही कर्ज प्रकरणे मंजूर करत हा मोठा घोटाळा केल्याचे समोर आले. त्यामुळे कंपनीने ४ कर्मचाऱ्यांसह ६५ कर्जदारांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत एल अ‍ॅण्ड टी फायनान्स कंपनीचे पुणे झोनल सेल्स मॅनेजर योगेश छगन सूर्यवंशी (रा. मगरपट्टा सिटी, हडपसर, पुणे) यांनी १७ डिसेंबर रोजी राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी नुसार कंपनीचे नगर जिल्ह्यात काम करणारे सेल्स एक्झिक्युटिव्ह हर्षल गोकुळ सालबांडे (रा.बेलापूर, ता.श्रीरामपूर), खंडेराव सिमाजी रक्ताटे (रा. लोणी, ता.आष्टी, जि.बीड), अक्षय चंद्रकांत कराळे (रा.कामत शिंगवे, ता. पाथर्डी), राहुल गणपत कांडेकर (रा. हमिदपूर, हिंगणगाव, ता.नगर) यांच्या सह ६५ कर्जदारांवर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे सर्व कर्जदार राहुरी, देवळाली प्रवरा, श्रीरामपूर, नेवासा, संगमनेर, पारनेर सह विविध तालुक्यातील आहेत.

नगर जिल्ह्यात विविध ठिकाणच्या शो रूम मध्ये कार्यरत असलेल्या या ४ सेल्स एक्झिक्युटिव्ह यांनी ऑगस्ट २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत या ६५ कर्जदार यांचे कागदपत्रे घेवून, त्यांची चौकशी करून त्यांच्या कर्जाच्या फाईल कंपनीकडे मंजुरी साठी पाठविल्या होत्या. या फाईल नुसार कंपनीने एकूण ४ कोटी ३ लाख ४० हजार ४७५ रुपयांचे कर्ज वितरीत केले. त्यातून या कर्जदारांनी विविध शो रूम मधून विविध कंपन्यांचे ट्रॅक्टर खरेदी केले. त्यानंतर त्यांच्या कर्जाचा पहिला हप्ता बँक खात्यातून ऑटो डेबीट होणे आवश्यक होते, पण तो झाला नाही. तसेच कर्जदारांनी वेळेत हप्तेही भरले नाहीत. त्यामुळे फायनान्स कंपनीच्या वसुली कर्मचाऱ्यांनी संबंधित पत्यांवर जावून कर्जदारांना कर्ज हप्त्याबाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

### दुसऱ्यांच्या घरासमोर उभे राहून कर्जदारांचे काढले फोटो

बऱ्याच कर्जदारांनी कर्जाचे हप्ते भरले नाहीत, तसेच त्यांच्या बँक खात्यातून ऑटो डेबीट ही झाले नाहीत. त्यामुळे कंपनीचे एरिया मॅनेजर आनंद पैठणे यांनी सखोल चौकशी केली असता सदर कर्जदार आणि सेल्स एक्झिक्युटिव्ह यांनी संगनमत करून कर्जदार ज्या घरात राहात नाहीत त्या घरासमोर उभे राहून त्यांचे फोटो काढून राहण्याचे पत्ते खोटे सांगून ४ कोटी ३ लाख ४० हजार ४७५ रुपयांचे कर्ज घेतले व त्या कर्जाची व्याजासह रक्कम ४ कोटी ८२ लाख ७७ हजार ६२५ रुपये अद्यापपर्यंत न भरता एल अ‍ॅण्ड टी फायनान्स कंपनीची फसवणूक केली.

असा चौकशी अहवाल एरिया मॅनेजर आनंद पैठणे यांनी दिल्यानंतर कंपनीचे पुणे झोनल सेल्स मॅनेजर योगेश सूर्यवंशी यांनी १७ डिसेंबर रोजी राहुरी पोलिस ठाण्यात ४ सेल्स एक्झिक्युटिव्ह व ६५ कर्जदार अशा ६९ जणांच्या विरुद्ध फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी या सर्वांच्या विरुद्ध बीएनएस ३(५), ३१६ (५), ३१८ (४), ३३५, ३३६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास स.पो.नि. सुदाम शिरसाठ हे करत आहेत.

## रात्रगस्त घालताना पोलिस कर्मचाऱ्याचे अपघाती निधन


सुदाम पोकळे (मयत)

नगर – अहिल्यानगर पोलिस दलात कर्जत पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी सुदाम राजू पोकळे (वय २९, मूळ रा. चिंचाळा, ता.आष्टी, जि.बीड) यांचे राशीन करमाळा रस्त्यावर रात्रगस्त घालत असताना १९ डिसेंबरला पहाटे २ च्या सुमारास अपघाती निधन झाले आहे.

सुदाम पोकळे हे कर्जत पोलिस ठाण्याअंतर्गत असलेल्या राशीन पोलिस चौकी येथे कर्तव्यावर होते. १८ डिसेंबरला रात्री त्यांची रात्र गस्तीसाठी ड्युटी होती. पहाटे २ च्या सुमारास राशीन ते करमाळा रस्त्यावर महात्मा फुले चौकात रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला मोटारसायकल उभी केलेली असल्याने ते पायी रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगात आलेल्या एका पिकअपने त्यांना धडक दिल्याने ते गंभीर जखमी होवून जागीच मयत झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलिस ठाण्यातील त्यांचे सहकारी पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

कर्जत ग्रामीण रुग्णालयात त्यांचे शवविच्छेदन केल्यावर १९ डिसेंबर रोजी त्यांच्यावर त्यांच्या मुळगावी चिंचाळा येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिस दलाने त्यांना बंदुकीतून हवेत फैरी झाडून मानवंदना दिली. शहीद पोकळे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, १ मुलगी असा परिवार आहे.

समाजाच्या सुरक्षिततेसाठी अखेरच्या श्वासापर्यंत झटणाऱ्या या शूर जवानाच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, ही घटना वेदनादायी असल्याची प्रतिक्रिया आ. सुरेश धस यांनी व्यक्त केली.

An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
Experts In Computer Training
C & C++ | PYTHON | PL/SQL | 2D & 3D CAD
MSOFFICE WITH AI | POWER BI & MS-EXCEL
TALLY PRIME & GST | DIGITAL MARKETING
100% JOB ASSISTANCE
JUST IN ANY COURSE 3900/-
Pipeline Branch — Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769
Old ST stand Branch — 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Delhi Gate Branch — 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# गडसंवर्धन मोहिमेला पंतप्रधान नरेंद्र मोदींची दाद, रायगडावर उपस्थितीची ग्वाही : खा. नीलेश लंके

## संसदेत पंतप्रधान मोदींची भेट घेत मांडल्या विविध मागण्या

नगर – संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी १९ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संसद भवनात भेट घेऊन ऐतिहासिक गड–किल्ल्यांच्या संवर्धनासाठी राबविण्यात येत असलेल्या मोहिमेच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त रायगडावर आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्याचे आमंत्रण दिले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे साक्षीदार असलेल्या रायगडावर होणाऱ्या या कार्यक्रमास उपस्थित राहण्याची इच्छा व्यक्त करत, शक्य तितक्या प्रमाणात उपस्थित राहण्याची ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी खा. लंके यांना दिली. या भेटीप्रसंगी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह, खासदार सुप्रिया सुळे, खासदार प्रियंका गांधी तसेच महाराष्ट्रातील इतर खासदार उपस्थित होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संसद भवनात भेट घेऊन चर्चा करताना खा.नीलेश लंके, समवेत केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह, खासदार सुप्रिया सुळे, खासदार प्रियंका गांधी आदी.

या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच गड–किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी खा. लंके यांनी सुरू केलेल्या मोहिमेचे मनःपूर्वक कौतुक केले. गड–किल्ले हे केवळ दगड–मातीचे अवशेष नसून ते स्वराज्याच्या इतिहासाचे जिवंत प्रतीक असल्याचे सांगत, या मोहिमेमुळे तरुणांमध्ये इतिहासाबद्दल जाणीव आणि अभिमान निर्माण होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. अशीच लोकसहभागातून चालणारी मोहीम सातत्याने सुरू ठेवावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत २५० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या अनेक सर्वसाधारण वाड्या–वस्त्या आजही पक्क्या रस्त्यांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आणून देत, अशा वाड्या–वस्त्यांना तातडीने रस्ते जोडणी करण्याची मागणी खा. लंके यांनी केली. पक्क्या रस्त्यांमुळे शिक्षण, आरोग्य आणि शेतीमालाच्या वाहतुकीला मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे वेधले लक्ष

खा. लंके यांनी अहिल्यानगर दक्षिण मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे पंतप्रधानांचे लक्ष वेधले. सध्या सुरू असलेली कांद्याची निर्यात सुरूच ठेवण्यात यावी, अन्यथा बाजारपेठेत भाव कोसळून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या सोबतच नाफेड व एनसीसीएफमार्फत शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या कांद्याच्या थकीत देयकांमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक ओझे वाढत असल्याचे सांगत, ही देयके तातडीने अदा करण्याची मागणी त्यांनी केली.

### औद्योगिक विकासासाठी दळणवळणाची गरज

सुपा औद्योगिक क्षेत्राचा झपाट्याने होत असलेला विकास लक्षात घेता, त्या अनुषंगाने सक्षम दळणवळण सुविधा आवश्यक असल्याचे खा. लंके यांनी नमूद केले. पुणे–नगर रेल्वेलाईन प्रकल्प, पुणे–नगर इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू करणे, तसेच पुणे–छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या कामाला गती देणे, या बाबी त्यांनी पंतप्रधानांच्या निदर्शनास आणल्या. या प्रकल्पांमुळे औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### सकारात्मक निर्णयांचे आश्वासन

खा. लंके यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवर गांभीर्याने विचार करून सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी दिली. विकास, शेतकरी हितसंबंध आणि सांस्कृतिक वारसा जपणे या तिन्ही बाबी केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

## दत्त मंदिरातून दानपेटी लंपास

नगर – एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेडी बायपास परिसरातील दत्त मंदिरातील दानपेटी फोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम व दानपेटी लंपास केल्याची घटना १६ डिसेंबरच्या रात्री घडली.

याबाबत उद्धव शिवाजी चव्हाण (वय ४०, रा. शेंडी, ता. नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अज्ञात चोरट्याने १६ डिसेंबरच्या रात्री मंदिराच्या मागील दरवाजाचे कुलूप आणि कडी–कोयंडा तोडून आत प्रवेश केला. मंदिरातील जुनी लाकडी दानपेटी तोडली. त्यामध्ये अंदाजे २५०० रुपयांची रोकड होती. चोरट्याने रोकड सह दानपेटी चोरून नेली आहे. १७ डिसेंबर रोजी सकाळी ही बाब निदर्शनास आल्यावर एमआयडीसी पोलिसांना माहिती देण्यात आली.

ही माहिती मिळताच एमआयडीसीचे स.पो.नि. माणिक चौधरी यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

याबाबत चव्हाण यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५, ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## बबईबाई मुळे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – शहरातील सावेडी नाका जवळलील गणेश कॉलनी येथील रहिवासी बबईबाई बाळासाहेब मुळे (वय ८१) यांचे १७ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर १८ डिसेंबर रोजी सकाळी अहिल्यानगर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सुना, नातू, नातसुना व पणतू असा परिवार आहे. सेवानिवृत्त सरकारी कर्मचारी सुनील बाळासाहेब मुळे यांच्या त्या मातोश्री होत.

## विक्रम शिंदे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – बालिकाश्रम जवळील सिद्धीबागेसमोरील गौतमनगर येथील रहिवासी विक्रम दयाराम शिंदे (वय ४८) यांचे १८ डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. १९ डिसेंबर रोजी त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगी, ३ भाऊ, बहीण, भावजय, मेहुणे असा परिवार आहे. किरण, विनोद, अविनाश शिदे यांचे ते बंधू होत.

## मतदान केंद्र असलेल्या शाळांना २० डिसेंबर रोजी सुट्टी जाहीर

नगर – जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर, ज्या शाळांमध्ये मतदान केंद्रे आहेत, अशा शाळांना २० डिसेंबर रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील संगमनेर, शिर्डी, राहुरी, श्रीरामपूर, शेवगाव, जामखेड व श्रीगोंदा (राहाता वगळून) तसेच कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी या नगरपरिषदा आणि नेवासा नगरपंचायत या ठिकाणी २० डिसेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. निवडणूक कामात अडथळा येऊ नये, यासाठी संबंधित शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या कालावधीत संबंधित मतदान केंद्रे (शाळांच्या इमारती) निवडणूक कामासाठी उपलब्ध राहतील तसेच तेथे पिण्याचे पाणी व वीज व्यवस्था सुरळीत राहील, याची दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनास देण्यात आले आहेत.

# अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या निवडणुकांसाठी मुंबई येथे शरद पवारांसमवेत बैठक

## उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्याशीही शिष्टमंडळाने केली चर्चा





नगर – राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या मुंबई येथील सिल्वर ओक निवासस्थानी १८ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बैठक पार पडली. यात छत्रपती संभाजीनगर महापालिकेचे निरीक्षक व प्रांत उपाध्यक्ष हाजी शौकतभाई तांबोळी, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हाध्यक्ष पांडुरंगराव तांगडे पाटील, तसेच पक्षाचे शहराध्यक्ष ख्वाजा शरपोद्दिन मुल्ला यांनी शरद पवारांची भेट घेतली. यावेळी पक्षाचे माजी प्रांताध्यक्ष जयंत पाटील उपस्थित होते.

बैठकीमध्ये आगामी महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने महाविकास आघाडीतील घटक पक्षांसोबत स्थानिक पातळीवर युती, जागावाटप, निवडणूक रणनीती, प्रचार यंत्रणा मजबूत करण्याबाबत, तसेच दोन्ही महानगरपालिकांसाठी स्टार प्रचारकांच्या सभा आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली. तसेच महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने उबाठा शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्याशीही चर्चा करण्यात आल्याची माहिती दिली. आगामी काळात छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी अधिक ताकदीने उतरावी, यासाठी संघटनात्मक बांधणी व प्रभावी प्रचारावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे या बैठकीत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे निरीक्षक व प्रांत उपाध्यक्ष हाजी शौकतभाई तांबोळी यांनी माहिती दिली.

## सुर्यभान तागडकर यांचे अल्प आजाराने निधन

नगर – वडारवाडी भिंगार येथील रहिवासी सुर्यभान नारू तागडकर (वय ८०) यांचे १८ डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. १९ डिसेंबर रोजी त्यांच्या पार्थिवावर वडारवाडी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बाळासाहेब तागडकर यांचे ते वडील होत.



## जनाबाई चौकटे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – प्रेमदान हडको येथील रहिवासी श्रीमती जनाबाई दत्तात्रय चौकटे (वय ७२) यांचे १७ डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गणेश चौकटे यांच्या त्या मातोश्री होत.

## लक्ष्मीबाई देहाडराय यांचे वृद्धापकाळाने निधन

शेवगाव – येथील राम मंदिर, शिवाजी चौकातील रहिवासी श्रीमती लक्ष्मीबाई विष्णुपंत देहाडराय (वय ७६) यांचे १९ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रिद्धी सिद्धी ऑईल मिल शेजार खुंटेफळ रोड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कैलास, भारत देहाडराय यांच्या त्या मातोश्री होत.

## राजाबाई गायकवाड यांचे अल्प आजाराने निधन

नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी राजाबाई बबनराव गायकवाड (वय ७३) यांचे १८ डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील येथील मोतीबाग अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, सुना, १ बहीण, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. संजय बबनराव गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत.

## रंभाबाई खराडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी रंभाबाई विठोबा खराडे (वय ७५) यांचे १८ डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पोलिस कॉन्स्टेबल पोपट, रमेश, दत्तू खराडे यांच्या त्या मातोश्री होत.

# निवडणूक काळात आक्षेपार्ह पोस्ट केल्यास कठोर कारवाई होणार

## सोशल मिडियाच्या ॲडमीनसह सदस्यांना पोलिसांचा नोटीसद्वारे इशारा

नगर – अहिल्यानगर महापालिकेसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका जाहीर झालेल्या असून १५ डिसेंबर पासून आचार संहिता लागू झालेली आहे. या निवडणूक काळात सोशल मिडिया वापरताना कोणतेही गैरकृत्य केल्यास, आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित केल्यास ॲडमीन सह पोस्ट करणाऱ्या सदस्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा अहिल्यानगर पोलिसांनी नोटीसीद्वारे दिला आहे.

या नोटीस मध्ये पोलिसांनी म्हंटले आहे की, निवडणूक काळात कोणत्याही उमेदवाराशी संबंधीत त्यांचे वैयक्तीक, कौटुंबिक अगर सामाजिक स्थरावर अवहेलना होईल असे आक्षेपार्ह टिका टिप्पणी करणे, मजकुर फोटो, व्हिडिओ (एडीट / मॉर्फ करुन) प्रसारीत करणे अथवा आलेल्या संदेशा वरुन आपले आक्षेपार्ह मत प्रकट करणे व पुढे पाठविणे, स्टेटस ठेवणे. मतदाराचे मन वळवण्यासाठी कोणत्याही धर्माच्या लोकांच्या धार्मिक लोंकाच्या धार्मिक भाषीक तसेच जातीय व्देष/तेढ पसरविणारे आक्षेपार्ह मजकुर फोटो, व्हिडीओ (एडीट/मॉर्फ करुन) प्रसारीत करणे, स्टेटस ठेवणे.

निवडणुकाच्या पार्श्वभुमीवर राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण होईल अशा प्रकारचे स्वतंत्र सोशल मिडीया ग्रुप निर्माण करुन त्या व्दारे आक्षेपार्ह मजकुर, फोटो, व्हिडीओ, (एडीट/मॉर्फ) करुन प्रसारीत करणे, स्टेटस ठेवणे. कुठल्याही व्हॉटसअप ग्रुप व तत्सम ॲप्लीकेशनचे माध्यमातुन आचासंहीतेचा भंग होईल अथवा दोन गटा मध्ये वाद निर्माण होईल अशी पोस्ट अथवा मजकुर, फोटो, व्हिडीओ टाकणे किंवा स्टेटस ठेवणे.वरील प्रकारचे कृत्य हे कायदयाने गुन्हा असुन आचासंहीतेचा भंग आहे. त्यामुळे आपण वरील प्रकारचे कृत्य करु नये, आपणाकडुन वरील प्रकारचे कृत्य केल्याचे निदर्शनास आल्यास व त्यावरुन एखादा गुन्हा घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास संबंधीत व्यक्तीसह ग्रुप ॲडमिन यांना जबाबदार धरण्यात येईल व आपले विरुध्द कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल व सदची नोटीस आपल्या विरुध्द पुरावा म्हणुन न्यायालयात सादर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. असा इशारा देण्यात आला आहे.

# कोपरगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज; २० डिसेंबर रोजी मतदान

शिर्डी – कोपरगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. २० डिसेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. यासाठी प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे. सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत मतदान प्रक्रिया होईल. ही प्रक्रिया निर्भय, निष्पक्ष व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी भारती सागरे यांनी दिली.

यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी अमोल भारती, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी महेश सावंत, सुहास जगताप आदी उपस्थित होते. मतदानाच्या दिवशी सकाळी ६:३० वा. सर्व मतदान केंद्रांवर 'मॉक पोल' (चाचणी मतदान) प्रक्रिया सुरू होईल. उमेदवारांनी नेमलेल्या मतदान प्रतिनिधींनी विहित नमुन्यातील फॉर्म व दोन रंगीत पासपोर्ट आकाराच्या छायाचित्रांसह वेळेवर उपस्थित राहणे आवश्यक आहे. मतदान प्रतिनिधी संबंधित यादीतील मतदार असणे बंधनकारक आहे. केंद्रात एकावेळी एकाच प्रतिनिधीला उपस्थित राहता येईल.

मतदानासाठी मतदारांजवळ निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ ओळखपत्रांपैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र (Original ID) सोबत असणे अनिवार्य आहे. ओळखपत्राशिवाय कोणालाही मतदानाचा हक्क बजावता येणार नाही.

मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात, तसेच केंद्राच्या आत मोबाईल नेण्यास सक्त मनाई आहे. उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी किंवा मतदार यांनी आपले मोबाईल सुरक्षित ठिकाणी ठेवूनच केंद्रात प्रवेश करावा.

प्रचार कालावधी संपल्याने आज रात्री १० वाजेपर्यंत उमेदवारांनी सर्व होर्डिंग्ज, बॅनर्स, प्रचार साहित्य स्वतःहून काढून घ्यावे. त्यानंतर आक्षेपार्ह साहित्य आढळल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

शहरातील सर्व ६९ मतदान केंद्रांवर चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यासाठी १ पोलीस उपअधीक्षक, २ पोलीस निरीक्षक, ९ पीएसआय, १० मोबाईल व्हॅन्स, १२९ पोलीस कॉन्स्टेबल व ७४ होमगार्ड्स तैनात असतील. निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणण्याचा प्रयत्न झाल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

मतदान संपल्यानंतर २१ डिसेंबर रोजी 'सेवानिकेतन विद्यालय' येथे मतमोजणी होणार आहे. यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून जारी केलेले ओळखपत्र (Pass) असलेल्या प्रतिनिधींनाच प्रवेश दिला जाईल. प्रशासनाने मतदानाच्या दिवशीही सर्व नागरिक, उमेदवार व राजकीय पक्षांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# सर्वच राजकीय पक्षांनी महापलिका निवडणुकीत ब्राह्मण समाजातील कार्यकर्त्यांना उमेदवारी द्यावी

नगर – ब्राह्मण सेवा संघ स्टेशन परिसर, आगरकर मळा, अहिल्यानगर संघाचा १७ वा वर्धापन दिन १४ डिसेंबर रोजी संध्याकाळी ७ वा. झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे इंजिनीयर पंकज जहागीरदार व अध्यक्षस्थानी केडगाव ब्राह्मण सेवा संघ अध्यक्ष नंदकुमार पोळ यांच्या उपस्थितीत झाला. प्रथमतः प्रमुख पाहुणे व अध्यक्ष, भिंगार ब्राह्मण सेवा संघ पदाधिकारी, जय श्रीराम मित्र बोरुडे मळा, पदाधिकारी व केडगाव ब्राह्मण सेवा संघाचे पदाधिकारी व आगरकर मळा परिसरातील ब्राह्मण बंधू–भगिनींचे स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व श्री गणेश, श्री परशुराम प्रतिमेचे पूजन करण्यात आले. परिचय शरदराव नगरकर यांनी करून दिला. कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थांच्या श्लोकाने केली.



ब्राह्मण सेवा संघ स्टेशन परिसर, आगरकर मळा, अहिल्यानगर संघाचा १७ वा वर्धापन दिन झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे इंजिनीयर पंकज जहागीरदार व अध्यक्षस्थानी केडगाव ब्राह्मण सेवा संघ अध्यक्ष नंदकुमार पोळ यांच्या उपस्थितीत झाला.

प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष बंडोपंत विप्रदास यांनी केले. ते म्हणाले आपल्या परिसरातील चिरंजीव वेदव्रत रेखे यांनी २००० मंत्र मुखोद्गत पठनाचा नारायण शास्त्री यांचा २०० वर्षा नंतर विक्रम केल्याबद्दल टाळ्यांचा गजरात संघातर्फे हार्दिक अभिनंदन केले. व संघाचा कार्याचा आढावा थोडक्यात सांगितला.

प्रमुख पाहुण्यांचा सत्कार अध्यक्ष बंडोपंत विप्रदास व उपाध्यक्ष उल्हास मुळे यांनी केला.

अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना नंदकुमार पोळ म्हणाले आता समाज बांधव एकत्र येण्याची काळाची गरज आहे. एकमेकांच्या सुखदुःखात सामील होणं. धार्मिक, सामाजिक, कार्यात सहभाग घेऊन संघटन करणे व त्याचप्रमाणे तरुण पिढीने एकत्र येण्याची गरज आहे. केडगाव ब्राह्मण संघाच्या कार्याचा आढावा थोडक्यात सांगितला. सामुदायिक व्रतबंध, मुला मुलींच्या विवाहाच्या समस्या वाढल्या आहेत. मुलींच्या अवास्तव अपेक्षा वाढल्या आहेत. पालकांनी याबाबत विचार केला पाहिजे.

भाजपा केडगाव मंडलाचे माजी अध्यक्ष पंकज जहागीरदार म्हणाले विवाहाच्या बाबतीत शाखा–भेद करू नये. मुला मुलींचे लग्न होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे मुलांनी नोकरीच्या पाठीमागे न लागता व्यवसाय करावा. यासाठी शासनाच्या अमृत योजना त्याच बरोबर इतर योजनांचा लाभ घेऊन प्रगती करावी असे म्हणाले. तसेच येणाऱ्या महापालिका निवडणुकीत ब्राह्मण समाजातील कार्यकर्त्यांना सर्वच पक्षांनी उमेदवारी द्यावी अशी मागणी केली.

वैभव जोशी यांनी परशुराम विकास महामंडळाची माहिती दिली.

केडगाव ब्राह्मण संघाचे पदाधिकारी भिंगार ब्राह्मण संघाचे पदाधिकारी, जय श्रीराम मित्र मंडळाचे पदाधिकारी व राजेंद्र जोशी (बन्सी महाराज मिठाईवाले) या सर्वांचा शरदराव नगरकर, प्रमोद कुलकर्णी, प्रकाश नगरकर, किशोर सराफ, सुभाष जगदाळे यांनी गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. तसेच सौ. वसुधा जोशी मुख्याध्यापकपदी व मोहनीराज लहाडे यांना उत्कृष्ट पत्रकार बहुमान मिळाल्याबद्दल व सौ. संध्या पावसे यांची भाजपा महिला सरचिटणीस पदी निवड झाल्याबद्दल या सर्वांचे संघातर्फे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

शरदराव नगरकर यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता प्रमोदराव कुलकर्णी, अक्षय सराफ, प्रकाश नगरकर, राजेंद्र जोशी, वैभव होशिंग, महिला अध्यक्ष श्रीमती मीरा महाजनी, सौ. संध्या गड्डम यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमानंतर सर्वांनी सुरुची भोजनाचा लाभ घेतला.




अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. पंकज अशिया यांच्या अध्यक्षतेखाली १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्यात आला.

# अल्पसंख्यांक हक्क दिनी समाजातील प्रलंबित प्रश्न तात्काळ सोडवावेत

नगर – अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. पंकज अशिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्यात आला. यात मिशन सेफ विहार अध्यक्ष तथा निमंत्रित जैन समाज प्रतिनिधी इंजिनिअर यश प्रमोद शहा यांनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र पोलिस, अल्पसंख्यांक विभाग आणि विशेषतः अहिल्यानगर जिल्हाधिकारी, जिल्हा प्रशासन आणि जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा पोलीस प्रशासन यांचे सकल जैन समाजातील सर्व ४ ही पंथांच्या गुरूभगवंत यांना विहार पदभ्रमण दरम्यान पोलीस सुरक्षा दिली जात असल्याने विहार सुरक्षितरित्या होण्यास मोठी मदत होत असल्याचे सांगत गुरु भगवंतवतीने विशेष आभार मानले.

यासोबतच याप्रसंगी शहा यांनी अल्पसंख्यांक बांधवांना येणाऱ्या विविध समस्यांची जाणीव जिल्हा प्रशासनाला करून दिली. जिल्ह्यात अल्पसंख्यांक योजनाच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी एक खिडकी योजना जिल्ह्यात चालू करण्याची मागणी केली. जेणेकरून विविध योजनांची माहिती एकाच छताखाली उपलब्ध होऊ शकेल. तसेच मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळास जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयात ऑफिसची जागा नेमून द्यावी जेणेकरून अल्पसंख्यांक समाज बांधवांना महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती घेणे व अडचणी सोडवण्यासाठी संपर्क करणे सुलभ होईल. जिल्हाकरिता व्यवसाय कर्ज योजना तत्काळ चालू करत यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, यासाठी प्रशासन वतीने शासनाशी पाठपुरावा करावा. तसेच विविध कर्ज योजनांची माहिती वृत्तपत्रात तसेच सार्वजनिक ठिकाणी बॅनरद्वारे लावण्यात यावे जेणेकरून योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यास मदत होईल. याचबरोबर कर्ज योजना प्रभावीपने राबवण्यासाठी बँक अधिकाऱ्यांची कर्ज प्रकरणा संदर्भात एकत्रित मीटिंग बोलवावी जेणेकरून अडचणी तात्काळ तांत्रिक बाबी सुटू शकतील. तसेच शिक्षण विभागास माध्यमिक तथा उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी सर्व मुख्याध्यापकांची एकत्रित मीटिंग घ्यावी व शाळा, कॉलेजमध्ये दर्शनी भागी अल्पसंख्यांक योजना संदर्भातील पत्रक माहिती लावण्यात यावे अशी सूचना करावी असे सांगितले. तहसील कार्यालयातील उत्पन्न, ईडब्ल्यूएस व इतर दाखले लवकरात लवकर विद्यार्थ्यांना मिळावेत आणि शासन वतीने अल्पसंख्यांक प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी मागणी केली.

अल्पसंख्यांक बांधवांसाठी उभारण्यात येणाऱ्या वसतिगृह लवकरात लवकर चालू करण्याच्या मागणी केली. पंतप्रधान १५ सूत्री योजनांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात तीमाही मीटिंग घेण्यात यावी जेणेकरून प्रशासना संबंधित अडचणी त्यात तात्काळ सोडवता येतील. अशा विविध समाजातील अडचणी यश शहा यांनी यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. या सर्व बाबींवर स्वतः जिल्हाधिकारी यांनी मनोगतात सांगितले की यश शहा व इतर प्रतिनिधींनी मांडलेल्या मुद्द्यांची नोंद प्रशासनाच्या वतीने मी स्वतः तसेच सर्व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घेतलेली आहे. यावर जिल्हा स्तरावरील अडचणी तत्काळ सोडवल्या जातील तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देखील शिक्षण विभाग, मौलाना आर्थिक विकास महामंडळ, पोलीस प्रशासन व इतर संबंधितांना तात्काळ दिल्या आणि महाराष्ट्र शासन संदर्भातील अडचणी प्रशासन वतीने सरकार ला प्रशासन वतीने कळवले जाईल.

तसेच तीमाही मीटिंगदेखील घेण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. सकारात्मक प्रतिसाद जिल्हाधिकारी यांनी यावेळी शहा आणि इतर सर्व प्रतिनिधी यांनी मांडलेल्या प्रश्नांवर दिला. यावेळी प्रशासनाचे शिक्षण विभाग, मौलाना आझाद, जिल्हा नियोजन विभाग, अल्पसंख्यांक विभाग, पोलिस प्रशासन, महापालिका प्रशासन, जिल्हा समाज कल्याण विभाग आदी विविध विभागातील प्रमुख उपस्थित होते. तसेच अल्पसंख्यांक सर्व समाजातील प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वांनी यावेळेस अल्पसंख्यांक समाज योजना प्रभावीपणे राबवण्याबाबत मागणी केली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## विकत घेतला श्याम

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन — संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी — डॉ. रामचंद्र देखणे — 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

साहित्य निर्मितीसाठी प्रतिभा आवश्यक आहे परंतु प्रतिभेने निर्माण केलेल्या साहित्यावर अनुभूतीचे संस्कार व्हावे लागतात. सृजनशक्ती आणि विचारशक्ती ही आपल्या पूर्वीच्या प्रतिभावंतांच्या, राष्ट्रप्रभूंच्या किंवा विचारवंतांच्याही प्रभावानेच वाटचाल करीत असते. काहींच्या शब्दांवर कुणाचा तरी प्रभाव असतो. कुणीतरी कुणाच्या तरी विचाराने प्रभावित होऊन आपले विचार मांडत असतात. एखादी निर्मितीदेखील पूर्णतः स्वयंभू आहे असे वाटते. काही वेळा एखादी मूळ शब्दकृतीच पुन्हा नवे रूप घेऊन नव्या रूपाने स्वयंभू होऊन प्रकटते. अशी गमतीशीर उदाहरणे प्रतिभावंतांच्या जीवनात घडत असतात. प्रसिद्ध कवी ग. दि. माडगूळकर यांनी 'जगाच्या पाठीवर' या चित्रपटासाठी

नाही खरचली कवडी दमडी ।
नाही वेचिला दाम।
बाई मी विकत घेतला श्याम ।।

ही अतिशय सुंदर रचना लिहिली. ते गाणे आजही गुणगुणत राहावेसे वाटते. शब्दांची मधुरता आणि कल्पनेची सुरेखता गदिमांनी प्रत्येक चरणामध्ये ओतली आहे. हे गाणे मीराबाईच्या एका सुंदर हिंदी पदावरून सुचले आहे, हे गदिमांनी मान्य केले होते आणि संगीतकार सुधीर फडके यांनीही या गीताच्या मागे असलेल्या मीराबाईच्या रचनेचे मोठेपण सांगितले होते. संत मीराबाईंची गौळणसदृश एक रचना आहे.

माई मैंने गोविंद लीन्हो मोल ।
कोई कहे हलका ।
कोई कहे भारी ।
लियो तराजू तोल।।'

'मी तराजू मांडून, गोविंदाला तोलून, त्याचे मोल देऊन त्याला घेतलंय. 'कोई कहे अनमोल' असे हे गोविंदधन मला सहजासहजी मिळालेले नाही.' मीराबाईंची हीच संकल्पना गदिमा त्या गीतातून विस्तारतात आणि जन्मभराच्या श्वासाइतके हरिनाम मोजून मी त्याला विकत घेतलाय असे सांगतात. प्रतिभावंतांच्या रचनांमध्ये समानता असते. कल्पनाविस्ताराचे आणि कल्पकतेचे सौंदर्य असते पण ते शब्दसौंदर्यही संतरचनेच्या प्रासादिक अभंगवाणीला समोर ठेवून जेव्हा अभिव्यक्त होते तेव्हा कविता आणि गीतही संतवाणीच्या अवस्थेला जाऊन पोहोचते.

गदिमांचा संतसाहित्याचा व्यासंग, अभ्यास आणि वाचन किती सूक्ष्म होते हे सांगायला नको. 'गोविंद लिन्हो मोल' आणि 'विकत घेतला श्याम' या दोन्ही रचना पाहिल्यावर मीराबाईंचे भजन गदिमांच्या शब्दाने पुन्हा प्रकटते आणि दोन्ही रचनांमधून नामसंकीर्तन उभे राहते. तसेच गदिमांच्या प्रासादिक प्रतिभेचे उत्तुंग दर्शन घडते.

**– किशोर गांधी, मो. ९८२२०२०६९१**

# अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक

नगर – अल्पसंख्यांक हक्क दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्यांक आढावा बैठक झाली. या बैठकीस जैन समाजातील विविध पदाधिकारी, मध्य रेल्वे समितीचे सलाहकार सुदर्शन डूंगरवाल, छावणी परिषद अहिल्यानगरचे उपाध्यक्ष वसंत राठोड, वसंत लोढा, संतोष गांधी, दर्शन गांधी, राजेंद्र बलदोटा, सिद्धार्थ सेठिया, योगेश मुथा, यश शाह तसेच समाजाचे अध्यक्ष व विविध प्रतिनिधी उपस्थित होते.



अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्यांक आढावा बैठक झाली.

या बैठकीत शासनाच्या अल्पसंख्यांकांसाठी असलेल्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शिक्षण, आर्थिक सहाय्य, व्यवसाय, कौशल्य विकास तसेच सामाजिक उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांमधून अल्पसंख्यांक घटकांना कशा प्रकारे लाभ मिळतो, याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात आतापर्यंत शासनाच्या अल्पसंख्यांक योजनांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामाची माहिती दिली. या योजनांमुळे अनेक अल्पसंख्यांक कुटुंबांना शैक्षणिक व आर्थिक आधार मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भविष्यात अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले.

बैठकीदरम्यान मध्य रेल्वे समितीचे सलाहकार सुदर्शन डूंगरवाल यांनी आपली भूमिका स्पष्ट करत महावीर युनिव्हर्सिटी तसेच अल्पसंख्यांक समाजाशी संबंधित इतर शैक्षणिक व सामाजिक संस्थांना शासनाच्या विविध योजनांचा थेट लाभ मिळावा, अशा मागण्या त्यांनी मांडल्या. शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून समाजाच्या शैक्षणिक, बौद्धिक व कौशल्याधारित विकासाला चालना देता येईल, असे त्यांनी नमूद केले. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, पायाभूत सुविधा, कौशल्य विकास प्रशिक्षण तसेच संशोधन व उच्च शिक्षणासाठी विशेष सवलती देण्यात याव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. महावीर युनिव्हर्सिटीसह इतर संस्थांना शासनस्तरावरून सहकार्य मिळाल्यास अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असे मत त्यांनी यावेळी मांडले. बैठकीदरम्यान अल्पसंख्यांक समाजासमोरील विविध प्रश्न व अडचणी मांडण्यात आल्या. शिक्षण, रोजगार, वसतिगृहे, शिष्यवृत्ती, व्यवसायासाठी अर्थसहाय्य तसेच सामाजिक सुविधांबाबतचे प्रश्न उपस्थित करण्यात आले. या प्रश्नांची दखल घेऊन योग्य तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

अल्पसंख्यांकांना शासनाच्या योजनांचा अधिकाधिक फायदा मिळावा यासाठी अशा प्रकारच्या बैठका नियमितपणे घेणे गरजेचे असल्याचे मत उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. यामुळे प्रशासन आणि समाज यांच्यात थेट संवाद साधता येतो व योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होते, असे मत यावेळी मांडण्यात आले.

या बैठकीत अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व बौद्धिक विकासासाठी सहकार्य करण्याबाबतही चर्चा झाली. शासन, प्रशासन आणि शैक्षणिक संस्थांच्या समन्वयातून अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडविण्याबाबत प्रशासनाची सकारात्मक भूमिका

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर – अल्पसंख्याक समाजाच्या समस्यांविषयी शासन सकारात्मक असून त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात 'अल्पसंख्याक हक्क दिन'साजरा करण्यात आला. त्यानिमित्त आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

जिल्हाधिकारी कार्यालयात 'अल्पसंख्याक हक्क दिन'साजरा करण्यात आला. त्यानिमित्त आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, उपशिक्षणाधिकारी संजयकुमार सरवदे, महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक कुंदा गोडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व अल्पसंख्याक समाज बांधव उपस्थित होते.

जिल्हा अल्पसंख्याक समितीची दर तीन महिन्यांनी बैठक आयोजित करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. अल्पसंख्याक समाजाच्या समस्या सर्व संबंधित विभागांच्या समन्वयातून प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. तसेच जी प्रकरणे शासनस्तरावर प्रलंबित असतील, त्यांचा पाठपुरावा करून ती मार्गी लावण्यात येतील, असे सांगत उपस्थित अल्पसंख्याक प्रतिनिधींकडून जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

सर्वप्रथम जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी दीपक दातीर यांनी अल्पसंख्याक समाजासाठी असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

अल्पसंख्याक समाजाच्या वतीने उपस्थित प्रतिनिधींनी समाजाच्या विविध मागण्या व समस्यांबाबत मते मांडली.

बैठकीला अल्पसंख्याक विभागाच्या योजना राबविणाऱ्या विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अहिल्यानगरमध्ये विश्व ध्यान दिवसानिमित्त २१ डिसेंबरला विशेष ध्यान सत्राचे आयोजन



नगर – अर्हम विज्ञा फाउंडेशन, अहिल्यानगर व अहिल्यानगर एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त सहभागातून विश्व ध्यान दिवसानिमित्त २१ डिसेंबर रोजी सकाळी ६.४५ वाजता विशेष ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत मानसिक आरोग्य, एकाग्रता व अंतःशांती यांचे महत्त्व लक्षात घेता हे ध्यान सत्र नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार आहे. कार्यक्रमाची संकल्पना SKIP THE SCROLL - REACH THE GOAL या विचारावर आधारित आहे. या ध्यान सत्रामध्ये सहभागींसाठी संगीतामय वॉर्म–अप व झुंबा, ध्यानाचा सहज, सुंदर व प्रभावकारी प्रयोग तसेच मेडिटेशन कार्ड्सद्वारे घरीही ध्यान करता येईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे अर्हम विज्ञा प्रणेते प्रवीणऋषिजी म. सा. यांचे LIVE मार्गदर्शन, जे सहभागींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.


हा कार्यक्रम मोने कला मंदिर, भाऊसाहेब फिरोदिया स्कूल ग्राउंड, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला असून १८ वर्षांवरील सर्व स्त्री–पुरुषांसाठी खुला आहे. इच्छुकांनी तत्काळ नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. नोंदणीसाठी संपर्क करा ८२०८७१६६०० / ९०२८८१९९७२

# आनंदधाम येथे २१ डिसेंबरला 'आत्मध्यान लाईव्ह शिबीर'

### जागतिक ध्यान दिनाचा उपक्रम, नागरिक व साधकांना सहभागी होण्याचे आवाहन



महेंद्रऋषीजी म.सा.



शिवमुनीजी म.सा.

नगर – मानव जीवनात वाढत चाललेला ताणतणाव, अस्वस्थता, नैराश्य आणि मानसिक अशांतता दूर करून अंतःकरणात शांती, संयम व सकारात्मकतेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने जागतिक ध्यान दिनानिमित्त शहरातील आनंदधाम येथे २१ डिसेंबर रोजी आत्मध्यान लाईव्ह शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात सर्व नागरिक व साधकांना सहभागी होण्याचे आवाहन वर्धमान स्था. जैन श्रावक संघाच्या वतीने करण्यात आले आहे. रविवारी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत ध्यान गुरु आचार्य सम्राट डॉ. श्री शिवमुनीजी म.सा. यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असून, यामध्ये जैन धर्मातील संत–महात्मे व साधु–साध्वीवृंदांचे पावन सान्निध्य लाभणार आहे. या कार्यक्रमास युवाचार्य प्रवर श्री महेंद्रऋषीजी म.सा., महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषीजी म.सा., प्रबुद्ध विचारवंत श्री आदर्श ऋषीजी म.सा., तसेच श्रमण संघीय सल्लागार श्री तारकऋषीजी म.सा. यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमधून ध्यान, आत्मशुद्धी, संयम, अहिंसा व जीवनातील संतुलन यावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे.





आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत माणूस बाह्य प्रगतीकडे धाव घेत असताना अंतर्गत शांती हरवत चालला आहे. अशा परिस्थितीत ध्यान हे केवळ साधना नसून जीवन जगण्याची कला बनली आहे. या कार्यक्रमात सामूहिक ध्यान सत्राच्या माध्यमातून सहभागी साधकांना मानसिक स्थैर्य, आत्मिक उन्नती, सकारात्मक विचारशक्ती व अंतर्मनातील शांतीचा अनुभव घेता येणार आहे. तसेच ध्यानाबरोबर योगाचे देखील धडे दिले जाणार असून या अभ्यासातून आरोग्य, एकाग्रता व जीवनातील निर्णयक्षमता कशी वृद्धिंगत होते यावरही मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या ध्यान महोत्सवात विविध स्तरांतील नागरिक, युवक, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सेवाभावामुळे आनंदऋषीजी हॉस्पिटलचा राज्यभरात नावलौकिक

### डॉ. विजय भंडारी यांचे प्रतिपादन; स्त्रीरोग, गर्भवती माता तपासणी शिबिराला प्रतिसाद



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये शुक्रवारी स्त्रीरोग व गर्भवती माता मोफत तपासणी शिबिराचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करताना डॉ. विजय भंडारी आदी.

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील उच्च दर्जाच्या आरोग्य सेवेचा सर्वसामान्य रूग्णांना मोठा लाभ होत असतो. आरोग्य सेवेचा हा वृक्ष लावण्यासाठी स्व.आ. अरूणकाका जगताप यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले याचा मी साक्षीदार आहे. आ.संग्राम जगताप यांचेही या मानवसेवेच्या कार्यास सहकार्य लाभत असते. जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य निस्वार्थपणे हॉस्पिटलचे संचालन करीत असतात. फेडरेशनने वर्धमान महावीर युनिर्व्हसिटीची उभारणी करून शैक्षणिक क्षेत्रातही पदार्पण केले आहे. हॉस्पिटलमध्ये रूग्णांना जास्तीत जास्त चांगली आरोग्य सेवा मिळण्यासाठी ते कायम आग्रही असतात. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगत आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान हॉस्पिटलमध्ये आहे. अनुभवी डॉक्टरांची टिम येथे कार्यरत आहे. त्यामुळेच राज्यभरातील रूग्ण विश्वासाने याठिकाणी उपचारासाठी येतात, असे प्रतिपादन शहर सहकारी बँकेचे संचालक तथा शिबिराचे आयोजक डॉ. विजय भंडारी यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये शुक्रवारी स्त्रीरोग व गर्भवती माता मोफत तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने झाले.

याप्रसंगी अजित भंडारी, डॉ. विजय भंडारी, मंगलाबाई भंडारी, सुरेखाताई भंडारी, डॉ.सुवर्णा गोलेचा (राहुरी), डॉ.सुशिल मुथियान, डॉ.सोनम मुथियान, अनुप लुणिया, विनोद भंडारी, राहुल भंडारी, सार्थक भंडारी, गुंजन भंडारी, वर्षा भंडारी, डॉ.आशिष अजित भंडारी, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ.प्रकाश कांकरिया, प्रकाश छल्लाणी, सतीश लोढा, हॉस्पिटलचे प्रशासनाधिकारी डॉ.आशिष भंडारी, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरुडे, डॉ.कृतिका पाटील आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, अनेक दानशूरांच्या सहयोगातून आनंदऋषीजी हॉस्पिटलची आरोग्य सेवा जास्तीत जास्त रूग्णांपर्यंत नेली जात आहे. डॉ. विजय भंडारी व परिवाराने सुरुवातीपासून या मानवसेवेच्या कार्यात योगदान दिले आहे. वर्षभर आरोग्य तपासणी शिबिरे घेवून रुग्णांना त्याचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न असतो.

डॉ.सोनम मुथियान म्हणाल्या की, चांगले आरोग्य हीच खरी संपत्ती असते. ही संपत्ती जपण्याचे काम आनंदऋषीजी हॉस्पिटल करीत आहे. विविध मोफत तपासणी शिबिरांमुळे गोरगरीब रूग्णांना लाभ होत असतो. जैन सोशल फेडरेशनचे हे कार्य कौतुकास्पद आहे. महिलांनी स्वत:च्या आरोग्याप्रती अधिक सजग राहीले पाहिजे. कारण महिलेचे आरोग्य चांगले असेल तर संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य चांगले राहते. महिला रूग्णांसाठी विशेष तपासणी शिबीर घेण्याचा उपक्रम स्वागतार्ह आहे.

डॉ.सुवर्णा गोलेचा म्हणाल्या, राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांना अभिप्रेत असलेले सेवाकार्य जैन सोशल फेडरेशन हॉस्पिटलव्दारे करीत आहे. येथील सर्व डॉक्टर, नर्सेस, स्टाफही सेवाभावी वृत्तीने रूग्ण सेवा देत असतात.

डॉ.कृतिका पाटील यांनी सांगितले की, महिला आरोग्य संपन्न असाव्यात या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या मोफत तपासणी बरोबरच सवलतीच्या दरात विविध शस्त्रक्रियाही करण्यात येत आहेत. याशिवाय विविध तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जात आहेत. महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. नियमित तपासणी केल्यास भविष्यातील मोठा धोका निश्चितच टळू शकतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले. शिबिरात ५४ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# खेळातूनही उज्ज्वल करिअर घडविता येते

## जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांचे प्रतिपादन; पंडित नेहरू हिंदी विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन

नगर – खेळांमुळे विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधली जाते. निरोगी जीवनासाठी लहान वयात मैदानावर घाम गाळणे आवश्यक आहे. खेळातूनही उज्ज्वल करिअर घडविता येते, अनेक क्लास वन अधिकारी खेळाच्या माध्यमातून पुढे आले आहेत. यासाठी सातत्यपूर्ण मेहनत व खेळाची तपश्चर्या आवश्यक आहे. जिल्ह्यात यावर्षी सर्वाधिक १४ राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या असून, लवकरच कबड्डीची राष्ट्रीय स्पर्धा होणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी दिली. संपूर्ण जिल्हा क्रीडामय झाला असून अनेक गुणवंत खेळाडू पुढे येत असल्याचेही त्यांनी सांगितले.


भुईकोट किल्ला परिसरातील हिंदी माध्यमाच्या पंडित नेहरू हिंदी विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव पार पडला.

भुईकोट किल्ला परिसरातील हिंदी माध्यमाच्या पंडित नेहरू हिंदी विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात पार पडला. शाळेच्या प्रशस्त प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात विविध मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या क्रीडा कौशल्याची चुणूक दाखवली. दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवामुळे संपूर्ण शालेय वातावरण क्रीडामय बनले आहे.

या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते मैदानाचे विधिवत पूजन करून करण्यात आले. यावेळी आकाशात फुगे सोडून स्पर्धांचा शुभारंभ करण्यात आला. उद्घाटनप्रसंगी संस्थेचे सचिव किशोर मुनोत, मुख्याध्यापक सुहास धीवर, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे ज्येष्ठ संचालक बाबासाहेब बोडखे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अंजली स्वामी यांच्यासह परीक्षित सुने, ठाकुर परदेशी, गोपीचंद परदेशी, नुतन आदक, कविता जोशी, कमल भोसले, सुदेश छजलानी, मोनिका मेहतानी, वैभव शिंदे, शिल्पा पाटोळे, शिक्षकेतर कर्मचारी योगेश गायकवाड आदी शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

संस्थेचे सचिव किशोर मुनोत म्हणाले की, खेळामुळे शारीरिक क्षमता वाढते तसेच जीवन आनंदी व आरोग्यदायी बनते. विद्यार्थी दशेत मैदानी खेळ खेळले तरच उद्याचे सक्षम आणि सुदृढ नागरिक घडू शकतात. सदृढ शरीराचा पाया मैदानी खेळ असून प्रत्येक विद्यार्थ्याने नियमितपणे मैदानात उतरले पाहिजे. खेळामध्ये जय-पराजय महत्त्वाचा नसून, स्पर्धेत सहभागी होणे व आपल्यातील कौशल्य सादर करणे अधिक महत्त्वाचे आहे. आयुष्यात शिक्षणाइतकेच खेळालाही तितकेच महत्त्व असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक कमल भोसले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय बाबासाहेब बोडखे यांनी करुन उपस्थितांचे स्वागत केले. दोन दिवस रंगणाऱ्या या क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो-खो, लंगडी यांसारख्या सांघिक तसेच धावणे, गोळा फेक, उंच उडी, लांब उडी आदी वैयक्तिक क्रीडा स्पर्धा पार पडणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीचंद परदेशी यांनी केले. मुख्याध्यापक सुहास धीवर यांनी आभार मानले.


पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी नाताळ सण उत्साहात साजरा केला.

# पार्वतीबाई म्हस्के नर्सिंगमध्ये नाताळ साजरा

## नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत : जगभरातील संधीबद्दल मार्गदर्शन

नगर – येथील पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या प्रथम वर्ष जीएनएम व प्रथम वर्ष बीएस्सी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित स्वागत कार्यक्रम व ख्रिसमसोत्सव उत्साहात पार पडला. नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरण, शिस्त, सुविधा, नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत, नवीन विद्यार्थ्यांची ओळख व नाताळ उत्सवाचे महत्त्व यांचा समावेश या कार्यक्रमात करण्यात आलेला होता.

संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुभाष म्हस्के यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करताना शिक्षणासोबत मानवी मूल्य, कर्तव्यनिष्ठा, व्यावसायिक उत्कृष्टतेचे महत्व अधोरेखित केले. तसेच नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना जगभरातील संधी याबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास संस्थेच्या विश्वस्त डॉ. सुमती म्हस्के, विश्वस्त डॉ. अभितेज म्हस्के, विश्वस्त डॉ. दीप्ती ठाकरे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर्किटेक्ट समीर ठाकरे उपस्थित होते. यावेळी कॉलेजचे प्राचार्य अजित चवरदार, काकासाहेब म्हस्के होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. विवेक रेगे, काकासाहेब म्हस्के फार्मसी कॉलेजच्या विभाग प्रमुख शुभांगी अलभर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक व सीनियर विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये पालक व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची : विशाल शेंडे

## भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या स्नेहसंमेलनात भारतीय संस्कृतीचे दर्शन, पारंपारिक गीत, रिमिक्स व रॅपची जुगलबंदी; महाराष्ट्रातील पारंपारिक झांज व ढोल पथकाने वेधले लक्ष

नगर – प्रत्येक मूल हे हुशार असते, त्यांना घडविण्याचे काम शिक्षक व पालकांचे असते. मुलांचा कल पाहून त्या दिशेने त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. मुलांचा मानसिक व शारीरिक विकास होण्याकडे देखील विशेष लक्ष देण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये पालक व शिक्षकांची भूमिका ही अतिशय महत्त्वाची ठरत असल्याचे सहाय्यक धर्मदाय आयुक्त विशाल शेंडे यांनी स्पष्ट केले.





अ.ए.सो. च्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या माध्यमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले.

अ.ए.सो. च्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या माध्यमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनात विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृती व परंपरेचे दर्शन घडविण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. महाराष्ट्रातील पारंपारिक झांज व ढोल पथकाने उपस्थितांचे लक्ष वेधले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सहाय्यक धर्मदाय आयुक्त विशाल शेंडे यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त ॲड. गौरव मिरीकर, सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, शैलेश मुनोत, सुनिता मुथा, तसेच विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड, उपप्राचार्य कैलास साबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, वैभव कुलकर्णी, शिक्षक प्रतिनिधी राजकुमार बनसोडे, विद्यार्थी प्रतिनिधी ओम मिसाळ, विद्यार्थिनी प्रतिनिधी नक्षत्रा इप्पलपेल्ली आदींसह शिक्षक, शिक्षकेतर, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात छायाताई फिरोदिया यांनी शालेय जीवन हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा काळ असतो. आजच्या आधुनिक काळात आर्टिफिशियल इंटेलिजन्स शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचा भाग बनत चालला आहे. त्याचा वापर फक्त विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी व शिक्षकांनी अध्यापनासाठी करण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रारंभी पाहुण्यांचे ढोल पथकाच्या गजरात स्वागत करुन विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी कोणताही एक खेळ किंवा कला जोपासावी त्यामुळे जीवन आनंदी व निरोगी बनते. खेळातून व्यक्तीमत्व विकास होतो. सकारात्मक ऊर्जा मिळते. कोणतीही परीक्षा न देता, खेळातून क्लास वन अधिकारी होता येते. करिअरचा एक चांगला पर्याय म्हणून आपल्या आवडत्या खेळाकडे पाहिले पाहिजे, असा सल्ला त्यांनी विद्यार्थी व पालकांना दिला. तर या संस्थेने अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू राज्याला दिले असल्याचे कौतुक केले.

पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य कैलास साबळे यांनी करून दिला. यावेळी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शाळांतर्गत विविध परीक्षां व स्पर्धापरीक्षांमध्ये यश प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी तमिळ व हिंदी-मराठी गीतांवर नृत्य, देशभक्तीपर नृत्य आदी नृत्यांचे सादरीकरण केले. पारंपारिक गीत, रिमिक्स व रॅपची जुगलबंदी या सांस्कृतिक कार्यक्रमातून पहावयास मिळाली. उपस्थित प्रेक्षक व पालकांनी त्यांना टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद दिली. सूत्रसंचालन अध्यापक सचिन पवार व शितल डिमळे यांनी केले. विविध गुणदर्शन व शारीरिक प्रात्यक्षिकाचे सूत्रसंचालन विद्यार्थी अबीर डोलारे, वेदिका लोंढे व कल्याणी गदादे यांनी केले. शिक्षक प्रतिनिधी राजकुमार बनसोडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता परशुराम मुळे यांनी वंदे मातरम या गीतातून केली.


राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, महाराष्ट्र व जिल्हा शाखा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय अंध मुलांची जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा २०२५ अहिल्यानगर जिल्ह्यात उत्साहात पार पडली.

# शालेय अंध मुलांची राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा उत्साहात

नगर – राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, महाराष्ट्र व जिल्हा शाखा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय अंध मुलांची जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा २०२५ अहिल्यानगर जिल्ह्यात उत्साहात पार पडली. १६ ते १८ डिसेंबर या कालावधीत झालेल्या या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यातील संघांनी सहभाग नोंदविला. अंध क्रीडापटूंनी दाखवलेली जिद्द, कौशल्य व संघभावना उपस्थितांच्या विशेष कौतुकास पात्र ठरली.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी आयुक्त यशवंत डांगे, नरेंद्र फिरोदिया, सविता काळे, दत्तात्रय जाधव, अनिल मालवे, रामचंद्र सुखटनकर, गोविंद लासुरे, अजित माने, श्रीमती ज्योती कदम, डॉ. बापु कांडेकर व डॉ. प्रकाश कांकरिया यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मैदान व्यवस्था, निवास, भोजन व इतर आवश्यक सुविधा सुरळीतपणे उपलब्ध करून देण्यात आल्या. आयोजकांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे संपूर्ण स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली.

समारोपप्रसंगी राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, महाराष्ट्र राज्य व जिल्हा शाखा अहिल्यानगरचे अध्यक्ष सुभाष बापू शिंदे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, अंध क्रीडापटूंमध्ये अपार आत्मविश्वास व जिद्द आहे. अशा स्पर्धांमुळे त्यांच्यातील क्रीडागुणांना चालना मिळते आणि समाजात सकारात्मक संदेश जातो. भविष्यात अंध खेळाडूंकरिता अधिकाधिक क्रीडासंधी निर्माण करण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी महासचिव नितीन पुंडलिक सोनार यांनी आपल्या भाषणात आवाहन केले की, अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध संघटनांनी दृष्टिहीन खेळाडूंसाठी अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या पाहिजेत. अशा स्पर्धांच्या माध्यमातून त्यांना नवे व्यासपीठ मिळते, त्यांच्या कलागुणांना वाव मिळतो तसेच आत्मविश्वास वाढीस लागतो.

# साईबन मध्ये 'शिव-परमात्मा: ज्ञान-भक्ती संगम' प्रकल्पाचे उद्‌घाटन

## हा केवळ एक स्थापत्य प्रकल्प नसून भक्ती व ज्ञान यांचा अनोखा संगम आहे : प्रा.राम शिंदे

नगर – येथील डॉ. कांकरियांच्या साईबन कृषी पर्यटन क्षेत्रामध्ये 'शिव-परमात्मा : ज्ञान-भक्ती संगम' प्रकल्पाचे उद्‌घाटन महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून जगदंबा भवन पुणे येथील राजयोगी दशरथ भाई, मिरा सोसायटी केंद्राच्या संचालिका राजयोगिनी उषा दिदी, अहिल्यानगर सेवा केंद्राच्या संचालिका राजयोगीनी राजराजेश्वरी दिदी, बी के डॉ. सुधा व डॉ. प्रकाश कांकरिया उपस्थित होते.


डॉ. कांकरियांच्या साईबन कृषी पर्यटन क्षेत्रामध्ये 'शिव-परमात्मा : ज्ञान-भक्ती संगम' प्रकल्पाचे उद्‌घाटन महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते झाले.

हा उपक्रम केवळ एक स्थापत्य प्रकल्प नसून भक्ती व ज्ञान यांचा अनोखा संगम आहे, प्रेरणादायी आध्यात्मिक प्रकल्प आहे. आजच्या धकाधकीच्या काळामध्ये सर्वांनाच मन:शांतीची अत्यंत गरज आहे. खरी मनाची शांती भौतिक बाबीमध्ये नसुन ती आध्यात्मामध्ये आहे. हे मर्म जाणुन साईबन कृषी पर्यटन क्षेत्रात हा प्रकल्प कार्यान्वीत झाला आहे. आत्ता पर्यंत अनेक क्रांती आपण पाहिल्या परंतू सध्या आध्यात्मिक क्रांतीची जगाला गरज आहे. यातुनच सकारात्मक परिवर्तन होऊ शकते. सामाजिक व वैश्विक शांतीसाठी आध्यात्माचा मार्ग उत्तम आहे असे प्रतिपादन प्रा. राम शिंदे यांनी उद्घाटन प्रसंगी केले.

सुरूवातीस शिव-परमात्मा : ज्ञान-भक्ती संगम अंतर्गत बेलपानाने बनविलेले भव्य, सुंदर आकर्षक ज्योर्तिलिंग (महादेवाची पिंड) यांचे ओम् नमो शिवायच्या मंगल मधुर ध्वनीमध्ये अनावरण करण्यात आले. टॉवर ऑफ पीस-शांती स्तंभ तसेच परमात्मा शिवाचा यथार्थ परिचय (गीता ग्रंथाच्या आधारावर), राजयोगा मेडिटेशनची माहिती सांगणारे पोस्टर प्रदर्शन दालनाचे उद्‌घाटनही झाले.

सदर प्रसंगी बोलतांना बी के दशरथ भाई म्हणाले की काळ बदलतो आहे, अनेक प्रकारच्या समस्या आज आपल्या समोर उभ्या आहेत. ऋतुचक्र बदलत चालले आहे. वैज्ञानिक व सामाजिक तज्ञ मंडळी पण विनाशाचा इशारा देत आहेत. अशा वेळेस धैर्य व आत्मिक उन्नतीसाठी फक्त आध्यात्मच आपल्याला तारू शकेल म्हणूनच हे स्थान समाजाचे कल्याण करणारे, व्यक्तीला मन:शांती प्रदान करणारे आदर्श व उत्तम स्थान आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

सदर प्रसंगी राजयोगीनी उषा दिदी म्हणाल्या की, आज डॉ. सुधाताईंचा वाढदिवसही आहे. आज महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहुन १०८ समर्पित ब्रह्माकुमारीज् सदर सोहळयास उपस्थित आहेत. हा केवळ योगायोग नसुन एक सुवर्णयोग आहे. आपल्या वाढदिवसानिमित्त डॉ. सुधाताईंनी एक अनोखी आध्यात्मिक भेट समाजाला देऊ केली आहे. राजयोगीनी ब्रह्माकुमारी राजराजेश्वरी दिदींनी 'शिव-परमात्मा : ज्ञान-भक्ती संगम' प्रकल्पा सोबतच मेडिटेशनची टेकडी, पीस पार्क, सृष्टी चक्र, मेडिटेशन हट, नक्षत्र उद्यान, शाश्वत यौगिक खेती, कल्पतरूह प्रकल्प, बोटींग, पपेट शो, राजयोगा मेडिटेशनची प्रदर्शनी आदिंचा ही लाभ पर्यटकांना मिळणार असुन एक सुखद आध्यात्मिक सहलीचा सर्वांनी आनंद घ्यावा असे त्यांनी सांगितले. सदर प्रसंगी डॉ. सुधा कांकरिया लिखित 'हृदय आरोग्याच्या गप्पागोष्टी' या पुस्तकाच्या तिसर्या आवृत्तीचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. मेडिसीन बरोबर मेडिटेशनचाही डोस हृदय आरोग्यासाठी आवश्यक आहे. हे अधोरेखीत झाले.

संचालिका डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. २७ वर्षांपूर्वी खडकाळ असलेल्या या जमिनीचे एम आय डी सी चे सांडपाणी वापरून पडिक जमिनीचा विकास करण्यात आला त्या बद्दल महाराष्ट्र शासनाचा वनश्री पुरस्कारही साईबनला प्राप्त झाला आहे. साईबन हे देशातील पहिले कृषी पर्यटन क्षेत्र आहे त्यामध्ये मेडिटेशन झोनचीही सुविधा ही मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज शिव-परमात्मा : ज्ञान-भक्ती संगम याचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते होत आहे याचा आनंद वाटतो. हजारो पर्यटकांना याचा लाभ प्राप्त होत आहे. निसर्गाच्या सानिध्यात आनंद लुटतांना आध्यात्मिक यात्रेचीही अनुभुती सर्वांना इथे होते हे महत्वपूर्ण आहे.

शिवस्तुती पर नृत्य मनस्वी कोरडे हीने सादर केले. सुत्रसंचालन मनिषा यंगल आणि बी के नरेशभाई यांनी केले.

कार्यक्रमाची सांगता हुरडा पार्टी व वनभोजनाने झाली. डॉ. प्रकाश कांकरिया यांनी आभार मानले.

# राष्ट्रीय पाठशाळा विद्यालयात निर्भया पथकाकडून विद्यार्थी सुरक्षिततेबाबत जनजागृती

नगर – जिल्हा पोलीस दलाच्या निर्भया पथकाच्या वतीने राष्ट्रीय पाठशाळा विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रात्यक्षिकासह जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे तसेच शहर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरेसे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.


राष्ट्रीय पाठशाळा विद्यालयात निर्भया पथकाकडून विद्यार्थी सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यात आली.

या प्रसंगी शहर निर्भया पथकाच्या प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शीतल मुगडे, महिला पोलीस कॉन्स्टेबल श्रीमती नागरे, महाडीक, खाटीक तसेच पोलीस कॉन्स्टेबल संदीप थोरात आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पोलीस उपनिरीक्षक शीतल मुगडे यांनी शाळा परिसरातील सुरक्षिततेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

शाळेच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे, विद्यार्थ्यांना गणवेश व ओळखपत्राशिवाय शाळा परिसरात प्रवेश न देणे, परिसरात विनाकारण फिरणाऱ्या व्यक्तींविरोधात तत्काळ कारवाई करणे व पोलिसांना माहिती देणे, शाळेत उच्च दर्जाचे व जास्त साठवण क्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, तक्रार पेटीची व्यवस्था करणे आदी सूचना त्यांनी दिल्या. तसेच बसचालक, सुरक्षा रक्षक, सफाई कर्मचारी यांची पोलीस चारित्र्य पडताळणी करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, विद्यार्थ्यांच्या बॅग व लॉकरची वेळोवेळी तपासणी करणे, महिला शिक्षक अथवा कर्मचाऱ्यांची निर्भया पथक समन्वयक म्हणून नेमणूक करणे आणि महिला सुरक्षा व सायबर सुरक्षेबाबत नियमित जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन करण्यात आले. कोणतीही अडचण उद्भवल्यास विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता थेट निर्भया पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या वेळी निर्भया पथकाने शाळेतील सीसीटीव्ही, तक्रार पेटी, संरक्षक भिंती तसेच सुरक्षिततेशी संबंधित सर्व नोंदी तपासून समाधान व्यक्त केले. सर्व बाबी अद्ययावत व योग्य असल्याबद्दल शाळा प्रशासनाचे कौतुक करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक जगन्नाथ बोडखे यांनी निर्भया पथकाचे स्वागत करून आभार मानले. कार्यक्रमास शिक्षक प्रविण उकिर्डे, सतीश काळे, स्वप्निल व्यवहारे, गणेश काथवटे, रामनाथ घनवट, कविराज बोटे, सुशील ननवरे, संजय सकट, आबासाहेब बेडके, बाबासाहेब पातकळ, अशोक चव्हाण, विजय वाणी, तुकाराम विघ्ने तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# गाडीलकर विद्यालयात कोडिंग आणि बुद्धिमत्ता प्रशिक्षण

नगर – केशवराव गाडीलकर विद्यालय सावेडी, अहमदनगर येथे ENpower एन्पॉवर आणि युवा अनस्टॉपेबल यांच्या संयुक्त विद्यमाने एन्पॉवरचे मुंबई येथील संचालक मुंगेकर सुशील भालचंद्र आणि प्रोग्राम मॅनेजर गायकवाड प्रशांत यांच्या प्रयत्नातून इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कोडिंगचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना बेसिक कोडिंग, निमेशन, स्क्रॅच ज्युनिअर, एमआयटी इन्व्हेंटर, पायथन इत्यादी शिकवले जाणार आहे.



गाडीलकर विद्यालयात कोडिंग आणि बुद्धिमत्ता प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

कोडलॅबचे उद्‌घाटन एन्पॉवरचे गायकवाड प्रशांत यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मनोगत श्री. गायकवाड यांनी सांगितले की आधुनिक काळात अध्ययन व अध्यापन पद्धतीत तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांनी केला पाहिजे त्यासाठी नवनवीन तांत्रिक बाबी त्यांनी आत्मसात कराव्यात व त्यांचा उपयोग आपल्या ज्ञानवृद्धी मध्ये करून घ्यावा. यापुढेही विद्यालयाला तांत्रिक विषयाबद्दल जी मदत लागेल ती फाउंडेशनतर्फे केली जाईल, असेही आश्वासन त्यांनी दिले.

उद्‌घाटनप्रसंगी महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे सचिव नामदेवराव गाडीलकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गायकवाड, रोहिणी गायकवाड, प्रशिक्षक नागोडे सर, सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती बोर्डे मनीषा उपस्थित होत्या.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. देशपांडे जयश्री यांनी केले. शिंदे बाबासाहेब यांनी आभार मानले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## स्मार्ट टीव्ही स्वच्छ करताय?

सणासुदीचे दिवस असोत किंवा एरवीही घराची साफसफाई करीत असताना काही गोष्टींची काळजी घ्यावी लागते. हल्ली अनेक अद्ययावत उपकरणे घरोघरी आलेली आहेत. त्यामध्येच स्मार्ट टीव्हीचाही समावेश होतो. स्मार्ट टीव्ही स्वच्छ करणे खूप सोपे आहे. परंतु जर आपण ते योग्य प्रकारे केले नाही तर ते खराब देखील होऊ शकते. स्मार्ट टीव्ही कसा स्वच्छ करावा याची ही माहिती...




**'या' चुका करू नका :**

**कधीही पाण्याची फवारणी करू नका** – पाणी स्क्रीनच्या आतील भागात घुसू शकते आणि टीव्हीचे नुकसान करू शकते.

**हार्ड ब–श वापरू नका** – हे स्क्रीन स्क्रॅच करू शकतात आणि त्याची चमक कमी करू शकतात.

**हे कपडे वापरू नका** – टीव्ही पुसण्यासाठी कधीही कागदी टॉवेल किंवा इतर रुक्ष कपडे वापरू नका. हे स्क्रीन स्क्रॅच देखील करू शकतात.

**रसायनांचा वापर करू नका** – टीव्ही स्क्रीनवर कोणतेही केमिकल्स वापरू नका. हे पदार्थ स्क्रीन खराब करू शकतात.

**कसा स्वच्छ करावा :**

**टीव्ही बंद करा आणि प्लग काढा** – नेहमी टीव्ही बंद करा आणि साफ करण्यापूर्वी प्लग काढून टाका. यामुळे तुम्ही कोणत्याही प्रकारचा धोका टाळू शकता.


**मऊ कापड वापरा** – स्मार्ट टीव्हीची स्क्रीन स्वच्छ करण्यासाठी नेहमी मऊ, कोरडे मायक्रोफायबर कापड वापरा.

**हलक्या हातांनी स्वच्छ करा** – स्मार्ट टीव्हीची स्क्रीन जास्त जोरात चोळू नका. हलक्या हातानेच स्वच्छ करा.

**धूळ काढण्यासाठी एअर ब्लोअरचा वापर करा** – टीव्हीच्या बाजूला आणि पोर्टमध्ये साचलेली धूळ काढण्यासाठी तुम्ही एअर ब्लोअरचा वापर करू शकता.

## मानवापश्चात पृथ्वीवर कुणाचे राज्य?

आपल्याकडे म्हटले जाते की या नाम–रूपाच्या दुनियेतील सर्व काही नाशवंत आहे. ग्रह–ताऱ्यांचे आयुष्य तुलनेने अधिक असले तरी एक दिवस त्यांचाही नाश होतोच, त्याप्रमाणे ही पृथ्वीही एक दिवस नष्ट होऊन जाईल. सध्या पृथ्वीवर मानवप्राण्याचेच साम्राज्य आहे. एकेकाळी पृथ्वीवर डायनासोरच्या अनेक प्रजाती राज्य करीत होत्या व त्या कालौघात नष्ट झाल्यावर मानवाचा विकास झाला. आता मानवप्रजाती नष्ट झाल्यावर पृथ्वीवर कोणता प्राणी राज्य करू शकतो हे तुम्हाला माहिती आहे का? संशोधकांच्या मते एक सागरी जीव असे राज्य करू शकतो. हा जीव म्हणजे ऑक्टोपस!



डेली मेलने याबाबतचे वृत्त दिले आहे. जगात एकीकडे युद्ध स्थिती आहे, तर दुसरीकडे हवामान झपाट्याने बदलत आहे. मानवासह अनेक प्रजातींवर यामुळे संकट निर्माण झालेले आहे. पृथ्वीवर लाखो प्राण्यांसह मानव नष्ट झाले तर कोणता जीव आपले अस्तित्व टिकवून ठेवेल याबाबत प्राणीशास्त्रज्ञ आणि जीवशास्त्रज्ञ संशोधन करत आहेत. जेव्हा मानवाचा अंत होईल तेव्हा ऑक्टोपस आपले टिकवून ठेवेल, असा दावा केला जात आहे. ऑक्टोपसकडे त्यासाठीचे शारीरिक आणि मानसिक गुण आहेत.

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर टीम कुलसन यांनी याबाबत एक शक्यता वर्तवली आहे. समुद्रातील प्राणी जगावर वसाहत निर्माण करतील. अटलांटिससारखी पाण्याखालील वसाहत तयार करण्यासाठी त्यांच्या स्वत:च्या बनवलेल्या जटिल साधनांचा वापर करतील, असे टीम कुलसन म्हणाले. ऑक्टोपस हा खूप बुद्धिमान जीव आहे. तब्बल नऊ मेंदू व तीन हृदये असणाऱ्या या प्राण्यात बुद्धिमत्ता, कुतूहल आणि एकमेकांशी संवाद साधण्याची क्षमता आहे. यामुळेच पृथ्वीवरून मानव नष्ट झाला तर ऑक्टोपस मानवाची जागा घेऊ शकतात. ऑक्टोपस त्यांच्या विशेष क्षमतेने एक दिवस जगाचा ताबा घेतील असे कौलसन यांनी 'द युरोपियन' मॅगझिनला सांगितले आहे. याबाबत आणखी एक तर्क मांडण्यात आले आहे. जलचर प्राणी हे ३० मिनिटे पाण्याबाहेर राहू शकतात, पण जलचर प्राण्यांनी अद्याप पाण्याबाहेर शिकार केलेली नाही. त्यांना जमिनीवर शिकार करण्यात तज्ज्ञ होण्यासाठी लाखो वर्षे लागतील. असे झाल्यास ऑक्टोपस सहज पृथ्वीवर ताबा मिळवू शकतात.

## तब्बल ३६२ कोटींचा हिरा

जगभरात अनेक सुंदर व अनोखे हिरे आहेत. अर्थातच त्यांची किंमत कोट्यवधी रुपयांची असते. गुलाबी रंगाचे हिरे दुर्मीळ असतात व त्यामुळे त्यांना किंमतही मोठीच मिळते. अशाच एका हिऱ्याची अवघ्या पाचच मिनिटांत एका लिलावामध्ये विक्री होऊन त्याला तब्बल ३६२ कोटी रुपयांची किंमत मिळाली होती!



हा हिरा जगातील सर्वात दुर्मीळ हिऱ्यांपैकी एक आहे. स्वीत्झर्लंडमध्ये २०१८ मध्ये झालेल्या लिलावामध्ये १९ कॅरेटचा हा दुर्मीळ गुलाबी हिरा तब्बल ३६२ कोटी रुपयांना (७० मिलीयन डॉलर) विकला गेला. अमेरिकेचे हिरे व्यावसायिक हॅरी विन्स्टन यांनी जीनिव्हामध्ये झालेल्या एका लिलावात हा हिरा खरेदी केला. 'पिंक लेगेसी' नावाचा हा हिरा लिलाव सुरू झाल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांत विकला गेला होता हे विशेष! अमेरिकेचे हिरे व्यावसायिक हॅरी विन्स्टन यांनी जीनिव्हामध्ये झालेल्या एका लिलावात हा हिरा खरेदी केला. नव्या मालकाने त्याला 'विन्स्टन पिंक लेगेसी' असे नाव दिले आहे. हा हिरा पांढऱ्या, चमकदार हिऱ्यांनी मढवलेल्या एका सुंदर अंगठीत जडवलेला आहे. जगात अनेक रंगांचे हिरे पाहायला मिळतात. त्यामध्ये निळ्या, गुलाबी रंगाच्या हिऱ्यांबरोबरच अगदी काळ्या रंगाचाही एक टपोरा हिरा आहे.

## निळ्या डोळ्यांच्या बालकाचे अवशेष

पुरातत्त्वीय संशोधनात अनेक अनोख्या गोष्टी समोर येत असतात. आता दक्षिण इटलीमध्ये झालेल्या एका आगळ्यावेगळ्या पुरातत्त्वीय शोधात शास्त्रज्ञांनी तब्बल १७ हजार वर्षांपूर्वीच्या निळे डोळे असलेल्या एका लहान मुलाचे अवशेष शोधून काढले आहेत. हा अद्भुत शोध प्रागैतिहासिक काळातील बालकांच्या जीवनशैली आणि आरोग्यावर प्रकाश टाकतो तसेच आपल्या प्राचीन पूर्वजांनी सामना केलेल्या आव्हानांची एक अनोखी झलक प्रदान करतो. हा सांगाडा पुरातत्त्वज्ञ मॉरो कॅलाटिनी यांनी ग्रोट्टा देल्ले म्युरा या गुहेत शोधला, ही गुहा इटलीतील मोनोपोली, पुलिया येथे स्थित आहे. ही जागा इटलीच्या बुटाच्या टोकाचा भाग म्हणून ओळखली जाते. शेवटच्या हिमयुगाच्या काळात प्रारंभिक मानवांसाठी ही जागा आश्रयस्थान होती.

या चांगल्या प्रकारे जतन केलेल्या थडग्यावर दोन मोठ्या खडकांच्या पट्ट्यांचे आच्छादन होते; परंतु तेथे कोणतीही पुरण्यासाठी लागणारी वस्त्रे सापडली नाहीत आणि या गुहेत केवळ हेच एकच दफन सापडले. २० सप्टेंबर, २०२४ रोजी नेचर कम्युनिकेशन्स या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनातून त्या बालकाच्या जीवनशैली आणि दिसण्यासंबंधी काही अद्भुत तपशील उघडकीस आले आहेत. डीएनए चाचणीतून सूचित होते की, बाळाचे डोळे निळे होते, तर त्वचेचा रंग सावळा होता आणि करड्या रंगाचे कुरळे केस होते. या वैशिष्ट्यांच्या एकत्रित अभ्यासामुळे त्या प्रदेशातील प्राचीन लोकसमूहांच्या आनुवंशिक विविधतेबद्दल मौल्यवान माहिती मिळते. हा शोध ॲमेझॉनमधील प्राचीन भित्तीचित्रांची आठवण करून देतो, ज्यातून नामशेष प्रजातींबद्दल माहिती मिळते. यावरून असे स्पष्ट होते की, पुरातत्त्वीय शोध भूतकाळाबद्दलच्या समजुतींना आपल्याला नव्या दृष्टिकोनातून पाहण्यास मदत करू शकतात.



मुलाच्या वंशाचा आणि आरोग्याच्या आव्हानांचा मागोवा जनुकीय विश्लेषणात असे आढळले की, हे बालक युगातील शिकारी– भटके यांच्या गटातील होते आणि ते व्हिलाब्रुना क्लस्टरच्या वंशजांमधील होते. हिमयुग संपण्यापूर्वी अशा गटांचे इटलीच्या द्वीपकल्पावर अस्तित्व असल्याचे या शोधावरून पुरेसे स्पष्ट होते. हा निष्कर्ष पुरातत्त्वशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ दोहोंसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. बालकाच्या डीएनएमधून त्याच्या संभाव्य आरोग्य समस्याही समोर आल्या. टीएनएनटी आणि एमवायबीपीसी३ या दोन जनुकांमध्ये म्युटेशन आढळले, जे प्रामुख्याने हायपरट्रॉफिक कार्डिओमायोपॅथी या हृदयाच्या आनुवंशिक आजाराशी संबंधित असते. या स्थितीमुळेच अंदाजे १६ महिन्यांचा असताना त्या बालकाचा मृत्यू झाला असावा. तसेच, बालकाच्या दातांच्या एनॅमलवर केलेल्या आयसोटोप विश्लेषणातून त्याच्या आईच्या गरोदरपणातील हालचालींविषयीही माहिती मिळाली. या विश्लेषणानुसार, गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यात ती स्थानिक परिसरातच राहिली होती. कदाचित आई आणि बालकाच्या आरोग्यासंबंधी चिंतांमुळे तिच्या हालचालींवर मर्यादा आली असावी, असे संशोधकांना वाटते.

## 'सुपरबग'ची काळजी मिटणार?

'सुपरबग' म्हणजे असे घातक जीवाणू जे औषधांनाही दाद देत नाहीत. अशा जीवाणूंनी अँटीबायोटिक्स औषधांविरुद्ध प्रतिकारक शक्ती विकसित केलेली असते व त्यामुळे ते अतिशय घातक बनतात. हा जगभरातील चिंतेचा विषय बनलेला आहे. ई–कोलीसारखे असे 'सुपरबग' औषधांनाही जुमानत नसल्याने त्यांच्या संसर्गावर उपचार करणे कठीण होऊन बसते. आता अशा सुपरबग्जविरुद्ध पुढील प्रभावी औषध विकसित करण्यासाठी 'एआय' म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्सची मदत होऊ शकते.



नवे अँटीबायोटिक विकसित करण्यासाठी संशोधक अशी जनुके शोधतात, जी जीवाणूंविरुद्ध प्रतिकारकता निर्माण करतात. प्रयोगशाळेतील संशोधनांमधून वेगवेगळ्या अँटीबायोटिक्सवर जीवाणू कसे प्रतिक्रिया देतात हे पाहिले जाते तसेच त्यांच्या जनुकीय रचनेतील म्युटेशन्सचे निरीक्षण केले जाते जे त्यांना तग धरून राहण्यासाठी प्रतिकारक शक्ती देतात. ही पद्धत प्रभावी असली तरी वेळखाऊ आहे आणि ती एखाद्या जीवाणूच्या प्रतिकारक शक्तीचे समग्र चित्र दाखवेलच असे नाही. एखाद्या जनुकीय रचनेत म्युटेशन्स म्हणजेच बदल न घडताही प्रतिकारकता निर्माण होते व ती कशी निर्माण होते हे शोधणे कठीण असते. विशेष म्हणजे जीवाणू हे एकमेकांशी असे प्रतिकारक जीवाणूंची देवाणघेवाणही करू शकतात. त्यामुळे एखाद्या स्ट्रेनमधील म्युटेशन्स पाहून त्याचा छडा लावता येत नाही. संशोधकांनी ई. कोलीमधील प्रतिकारक जनुके ओळखण्यासाठी एक नवी पद्धत वापरली. त्यांनी यासाठी कॉम्प्युटर मॉडेलिंगचा वापर केला. त्यामधून त्यांना अशा जनुकांना 'ब्लॉक' करण्यासाठी नवी संयुगे डिझाईन करण्याची संधी दिली, जेणेकरून प्रचलित उपचार पद्धती अधिक प्रभावी होईल. त्यासाठी त्यांनी 'एआय' म्हणजेच 'मशिन लर्निंग अल्गोरिदम'चा वापर केला. त्याला नवी जनुके व म्युटेशन्सवर फोकस करण्याचा डेटा देण्यात आला होता.

## पीच ड्रॉप एक्सपिरिमेंट काय आहे?

जगात सर्वाधिक काळ सुरू असलेल्या प्रयोगाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये आहे. हा प्रयोग ऑस्ट्रेलियातील क्विन्सलॅण्ड विद्यापीठातील वैज्ञानिकांनी केला आहे. ऑस्ट्रेलियामधील हा प्रयोग मागील सुमारे १०० वर्षांपासून सुरू आहे. या प्रयोगाचं नाव, 'पीच ड्रॉप एक्सपिरिमेंट' असं आहे. विशेष म्हणजे हा प्रयोग अजून १०० वर्ष सुरू राहणार आहे. हा प्रयोग १९२७ साली ऑस्ट्रेलियन भौतिकशास्त्रज्ञ थॉमस पारनील यांनी सुरू केला.



या प्रयोगामध्ये पीच नावाच्या पदार्थाची फ्लुएडीटी आणि हाय व्हेलॉसिटी म्हणजेच तरलता आणि उच्च चिकटपणाची चाचणी घेतली जात आहे. पीच हा पदार्थ टार म्हणजेच डांबरापासून बनवलेला पदार्थ असून, तो तरलतेच्या बाबतीत म्हणजेच वाहण्याच्या गुणधर्माबाबतीत जगातील सर्वात घट्ट पदार्थ आहे. हा पदार्थ पूर्वी जहाजांच्या वॉटरप्रुफिंगसाठी वापरला जायचा. पारनील यांनी पीचचा एक तुकडा गरम केला आणि तो एका नरसाळ्यामध्ये ओतला. हे नरसाळं त्यांनी हवाबंद केलं. त्यानंतर पुढील तीन वर्षांत हे गरम पीच पूर्णपणे थंड झालं. १९३० साली त्यांनी नरसाळ्याचा काही भाग कापला आणि तो पदार्थ कधी वाहत येतो याची चाचणी सुरू केली. विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार, या प्रयोगाचा सेटअप प्रदर्शनासारखा लावला आहे. तसेच या सेटअपसाठी काही विशेष वातावरण किंवा इतर गोष्टींची तरतूद करण्यात आलेली नाही. उलट या प्रयोगाचा सेटअप एका केबिनमध्येच असून तो उघड्यावरच ठेवण्यात आला आहे. या पीचवर तापमान आणि वातावरणाचा परिणाम व्हावा, असं अपेक्षित असल्याने या सेटअपच्या आजूबाजूला विशेष कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. पारनील यांच्या मृत्यूनंतर प्राध्यापक जॉन मेडस्टोन यांनी या प्रयोगाचे अधिकार स्वत:कडे घेतले. त्यांनी हा प्रयोग १९६१ रोजी स्वत:च्या देखरेखीखाली घेतला. तेव्हापासून पुढील ५२ वर्ष त्यांनीच हा प्रयोग संभाळला. या नरसाळ्यामधून पीच हळूहळू बाहेर येत आहे. या पीचचा पहिला थेंब बाहेर पडण्यासाठी ८ वर्षांचा कालावधी लागला असून, अन्य पाच थेंब पडण्यासाठी पुढचे ४० वर्ष लागले. सध्याच्या अपडेटनुसार आतापर्यंत या नरसाळ्यातून पीचचे ९ थेंब पडले असून, या आगामी १० वर्षांमध्ये अजून एक थेंब पडणं अपेक्षित आहे. या प्रकल्पाची गुंतागुंत पाहता कोणीही प्रत्यक्षात या पीचचा थेंब पडताना पाहिलेला नाही. खरं तर पीचकडे पाहिल्यावर तो स्थायू पदार्थ वाटेल. हातोडीने तो तोडता येईल. मात्र, या प्रकल्पामुळे पीचची तरलता ही पाण्याच्या तुलनेत १०० अब्ज पट असल्याचं दिसून आलं आहे. तसेच या नरसाळ्यामध्ये एवढं पीच शिल्लक आहे की पुढील १०० वर्षांपर्यंत हा प्रयोग सुरू ठेवता येणार आहे. २००५ साली जॉन मेडस्टोन आणि थॉमस पारनील (मरणोत्तर) यांना या प्रकल्पासाठी आयजी नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला. खरं तर हा पुरस्कार अशा विचित्र प्रकल्पांसाठी दिला जातो जे ऐकून लोकांना हसू येतं; मात्र हे प्रकल्प लोकांना विचार करायलाही भाग पाडतात. आयजी नोबेल पुरस्कार आणि नोबेल पुरस्कार, हे दोन वेगळे पुरस्कार आहेत, हे इथे नमूद करणे महत्त्वाचे ठरते.



## साठीतल्या आजीबाईंचा पुश–अप्सचा विक्रम

चांगल्या आरोग्यासाठी नियमित व्यायाम करणे महत्त्वाचे असते. परंतु चाळीशीनंतर चालणे, वॉर्म अप, योगासन असा व्यायाम अनेक जण करतात. परंतु वयाच्या साठीत कुणी १,५७५ पुश–अप्स तासाभरात काढू शकतो का? यावर तुमचे उत्तर नाही असणार आहे. परंतु कॅनडामधील ५९ वर्षीय डोनाजीन वाइल्ड यांनी हा विक्रम केला आहे. त्यांचे वय केवळ संख्येने वाढले आहे. परंतु त्यांचे शरीर युवकांना मागे टाकणारे आहे. डोनाजीन यांनी आजी होण्याच्या वयात गिनीज वर्ल्ड रिकॉर्ड्समध्ये नाव नोंदवले आहे. त्यांनी तासाभरात १,५७५ पुश–अप करण्याचा विक्रम केला आहे.




डोनाजीन यांनी मार्चमध्ये केलेल्या त्यांच्या मागील विक्रमानंतर आता नवीन विक्रम केला आहे. मार्च महिन्यात त्यांनी ४ तास ३० मिनिटे आणि ११ सेकंद प्लँक स्थितीत राहून जगाला चकित केले होते. आता पुश–अपसाठी विशेष मानके पाळली गेली. प्रत्येक पुश–अपसाठी कोपर ९० अंशांपर्यंत वाकवणे आणि नंतर हात पूर्णपणे सरळ करणे आवश्यक आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्समधील दोन पंचांनी त्याची गणना केली. त्यानंतर त्यांचे पुश–अप स्कोअरबोर्डवर सतत अद्ययावतही केले. डोनाजीन यांनी पहिल्या २० मिनिटांत ६२० पुश–अप मारले. त्यानंतर त्यांनी १५ मिनिटांसाठी २० आणि ५ पुश–अपचे सेट पुन्हा केले. सरतेशेवटी त्यांनी प्रति सेट सरासरी १० पुश–अपसह जुना विक्रम मोडला. डोनाजीन यांची ११ आणि १२ वर्षांची नातवंडे यांनी त्यांना त्यासाठी सतत प्रोत्साहन दिले. त्यांचा विक्रम पूर्ण होताच त्या नातवंडांनी त्यांच्या नावाचा जयजयकार केली. डोनाजीन यांनी सांगितले की, मला माझे अश्रू थांबवून माझ्या ध्येयावर लक्ष केंद्रित करावे लागले. मला वाटले की मी आणखी पुश–अप करू शकतो. पुश–अप ही युवकांसाठी चांगला व्यायम आहे. परंतु वरिष्ठ नागरिक हा प्रकार फारसा करत नाही. पुश–अपमुळे चेस्ट, खांदे आणि ट्रायसेप्सचे मसल्स मजबूत होतात. तसेच कोर मसल्स सक्रिय असतात. त्यामुळे शरीरातील बॅलेन्स चांगला राहतो. हृदयाची स्पंदने वाढतात. आरोग्यात सुधारणा होते. आता डोनाजीन वाइल्ड यांनी कोणत्याही गोष्टीला वयाची मर्यादा नसते, हे सिद्ध करून दिले आहे.

# उडदावणे गावात 'मधाचे गाव' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश

नगर – मधमाशा संवर्धनातून निसर्गाचे रक्षण करणे, तसेच मध आणि मधमाशांपासून मिळणाऱ्या उत्पादनांवर प्रक्रिया व विक्री व्यवस्था निर्माण करून 'मधुपर्यटन' वाढवणे, या उद्देशाने अकोले तालुक्यातील 'मौजे उडदावणे' गावाची निवड करण्यात आली आहे. या गावात 'मधाचे गाव' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात 'मधाचे गाव' योजनेसंदर्भात आयोजित बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया.

जिल्हाधिकारी कार्यालयात 'मधाचे गाव' योजनेसंदर्भात आयोजित बैठकीत डॉ. आशिया बोलत होते. या बैठकीस जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बाळासाहेब मुंडे, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, जिल्हा कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे, सहाय्यक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी किरण मोरे, उद्योग अधिकारी अशोक बेनके, उडदावणेच्या सरपंच कीर्ती गिरे, ग्रामसेवक श्रीमती जाधव, माजी सरपंच बच्चू गांगड, मध निरीक्षक व्ही. आर. चौधरी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, राज्यातील १० गावांमध्ये 'मधाचे गाव' योजना राबविण्यास शासनाने मान्यता दिली असून, यात आपल्या जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील उडदावणे गावाचा समावेश आहे. या गावातील २५ होतकरू तरुणांची निवड करून त्यांना मधमाशी पालनातून कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून द्यावा. यासाठी त्यांना मध संकलन, प्रक्रिया, ब्रँडिंग, पॅकिंग तसेच मध, मेण, पराग यांपासून विविध उत्पादने तयार करण्यासाठी तज्ज्ञांमार्फत प्रशिक्षण द्यावे.

तसेच, उडदावणे गावात सामूहिक सुविधा केंद्रासाठी जागेची निश्चिती करून तातडीने बांधकाम सुरू करावे. मधमाशांविषयी माहिती देणारे विशेष दालन आणि 'सेल्फी पॉईंट' उभारण्यात यावा.

मधाच्या गावाची सर्वदूर प्रसिद्धी व जनजागृती करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

सुरुवातीला जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बाळासाहेब मुंडे यांनी योजनेच्या प्रगतीची माहिती दिली. बैठकीस संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# रस्ता अडवून सभा घेणाऱ्या आयोजकावर गुन्हा दाखल

नगर – शहरातील वंजार गल्ली भागात कोणताही अधिकृत परवाना न घेता सार्वजनिक रस्ता पूर्णपणे बंद करून महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सभेचे आयोजन केल्याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वर्चस्व ग्रुपचे अध्यक्ष सागर मुर्तडकर यांच्याविरुद्ध ही कारवाई करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुर्तडकर यांनी वंजार गल्ली ते रामचंद्र खुंट या मार्गावर वॉर्ड क्रमांक ५ आणि १० मधील नागरिकांची बैठक व स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी प्रशासनाची कोणतीही पूर्वपरवानगी घेण्यात आली नव्हती. रस्ता अडवल्यामुळे या भागातील वाहतूक विस्कळीत होऊन पादचाऱ्यांची मोठी गैरसोय झाली. यावेळी गस्तीवर असलेले पो.नि. जगदीश भांबळ, पोलिस अंमलदार रावसाहेब खेडकर, सुमित गवळी, सुजय हिवाळे, इनामदार, त्रिमुखे यांनी ही गर्दी पाहून विचारणा केली व रस्ता मोकळा करण्याच्या सूचना दिल्या. मात्र, प्रशासकीय आदेशांचे उल्लंघन करून कार्यक्रम सुरूच ठेवल्याने पोलिसांनी ही कठोर भूमिका घेतली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्याचे गोपनीय शाखेचे अंमलदार सौरभ त्रिमुखे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग केल्याचा ठपका ठेवत भारतीय न्याय संहिता कलम २२३, १२६ (२) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१), ३७ (३), १३५ प्रमाणे गुन्हा नोंदवला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# आरटीओ कार्यालयातील गैरव्यवहारविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'उपोषण' सुरू



नगर – बहुउद्देशीय वाहतूक चालक–मालक माथाडी मंडळाच्या वतीने आरटीओ कार्यालयातील गैरव्यवहार थांबवण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. अधिकाऱ्यांकडून एजंटांच्या माध्यमातून दरमहा हप्ते वसुली केली जात असून चालक– मालकांना विनाकारण अडवणूक व त्रास दिला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. उपोषण वाहतूक संघटनेचे सचिव अजय मखरे व अध्यक्ष डॉ. जी.एच. पांडुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. यावेळी गणेश देव, पाराजी लोखंडे, मोहन लोखंडे यांच्यासह चालक–मालक उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, आरटीओ कार्यालयात विविध कामांसाठी वर्गवारी व चक्रानुसार मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर पैसे मागितले जातात. या कारभारामुळे सामान्य नागरिक व चालक–मालक आर्थिक तसेच मानसिक त्रास सहन करत आहेत. याबाबत यापूर्वी अनेक वेळा निवेदने देऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

संघटनेने आरटीओ अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून तसेच आंदोलन व उपोषणाच्या माध्यमातून गैरव्यवहार थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र तरीही बेकायदेशीर वसुली सुरूच असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ११ डिसेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले असून, जोपर्यंत आरटीओ कार्यालयातील गैरव्यवहार थांबत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचा इशारा डॉ. जी.एच. पांडुळे यांनी दिला आहे.

# श्री चैतन्य टेक्नो शाळेच्या विद्यार्थिनीची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

नगर – नगर–कल्याण रोडवरील जाधवनगर येथील श्री चैतन्य टेक्नो सीबीएससी शाळेची इयत्ता सातवीची विद्यार्थिनी कु. शौर्या शैलेश गवळी हिने १६ व १७ डिसेंबर रोजी आबासाहेब काकडे महाविद्यालय, शेवगाव (जि. अहिल्यानगर) येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या कामगिरीच्या जोरावर तिची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय बेसबॉल स्पर्धेसाठी १७ वर्षाखालील मुलींच्या संघात निवड झाली असून तिने शाळेचे व शहराचे नाव उज्वल केले आहे.



श्री चैतन्य टेक्नो सीबीएससी शाळेच्या विद्यार्थिनीची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते कु. शौर्या गवळी हिचा विशेष सत्कार व कौतुक करण्यात आले.

या यशाबद्दल अहिल्यानगर शहराचे जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते कु. शौर्या गवळी हिचा विशेष सत्कार व कौतुक करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हा क्रीडा अधिकारी खुरांगे म्हणाले की, श्री चैतन्य टेक्नो शाळेने अल्पावधीतच अहिल्यानगर शहरात शैक्षणिक क्षेत्रात भक्कम स्थान निर्माण केले असून, आजच्या या यशामुळे ही शाळा केवळ शिक्षणातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही अग्रेसर असल्याचे स्पष्ट होते.

या प्रसंगी शाळेच्या प्राचार्या सौ. के. एन्सी, अॅकेडमिक डीन श्री. सुमन, शशी कुमार यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सर्वांनीच कु. शौर्या हिचे अभिनंदन केले. तिला शाळेचे क्रीडा प्रमुख सुनील मोहिते, क्रीडाशिक्षक आदित्य क्षीरसागर तसेच बेसबॉलचे एनआयएस प्रशिक्षक सोमनाथ सपकाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

शौर्या हिच्या यशामध्ये शाळेबरोबरच पालकांचाही महत्त्वाचा वाटा असल्याचे प्राचार्यांनी नमूद केले. अहमदनगर ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष व महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेचे सचिव शैलेश गवळी यांची ती कन्या असून, खेळाची आवड व शिस्त घरातूनच जोपासली गेल्याचे त्यांनी सांगितले.

# जैन ओसवाल पतसंस्थेत २२ व २३ डिसेंबरला आयुष्यमान भारत कार्ड नोंदणीची व्यवस्था

नगर – केंद्र सरकारने आयुष्मान भारत योजना सुरु केली असून या योजनेत नागरिकांना ५ लाखांपर्यंत मोफत उपचार दिले जातात. याशिवाय ७० वर्षांपुढील ज्येष्ठ नागरिकांसाठीही मोफत उपचारांची सुविधा आहे. या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी नोंदणी करून आयुष्यमान भारत कार्ड तयार करणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा यासाठी सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेने आपल्या नगर अर्बन बँक रोडवरील मुख्य कार्यालयात आयुष्यमान भारत कार्ड नोंदणीची व्यवस्था केली आहे. २२ आणि २३ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते २ आणि दुपारी ३ ते ५ यावेळेत नागरिकांना नोंदणी करुन कार्ड तयार करुन घेता येईल, अशी माहिती पतसंस्थेचे चेअरमन अभय पितळे यांनी दिली.



अभय पितळे



शैलेश गांधी

चेअरमन अभय पितळे यांनी सांगितले की, पतसंस्थेने उत्कृष्ट बँकिंग सेवा देतानाच स्व.सुवालाल गुंदेचा यांच्या शिकवणुकीप्रमाणे कायम सामाजिक बांधिलकीही जपली आहे. आताच्या काळात वैद्यकीय उपचार खूप महागले आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी केंद्र सरकारची आयुष्मान भारत योजना मोठा दिलासा देणारी आहे. कार्ड धारकांना शासनमान्य खाजगी हॉस्पिटलमध्येही मोफत उपचारांची सुविधा उपलब्ध आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी योजनेचा लाभ घ्यावा. यासाठी पतसंस्थेत कार्ड काढण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.पतसंस्था शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने नागरिकांसाठी कार्ड काढणे सोयीचे होणार आहे. नोंदणीसाठी येताना आधार कार्ड सोबत आणावे. पतसंस्थेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक, नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन चेअरमन अभय पितळे, व्हाईस चेअरमन शैलेश गांधी व सर्व संचालक मंडळाने केले आहे.

# एमआयडीसीतील सायकल कंपनीतून ६.३८ लाख रुपयांच्या साहित्याची चोरी

नगर – एमआयडीसीतील सायकल मॅन्युफॅक्चरींग कंपनीतून अज्ञात चोरट्यांनी ६ लाख ३८ हजार ८९० रुपये किंमतीचे विविध प्रकारचे साहित्य चोरुन नेल्याची घटना १६ डिसेंबर रोजी रात्री १२ ते १८ डिसेंबर रोजी सकाळी ९ या कालावधीत घडली.

याबाबत सुनील मच्छिंद्र मते (वय ४४, रा.खंडोबा मंदिराजवळ, नवनागापूर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची एमआयडीसी परिसरात डॉन ००७ नावाची सायकल मॅन्युफॅक्चरींग कंपनी आहे. या कंपनीतून अज्ञात चोरट्यांनी विविध प्रकारचे साहित्य असा ६ लाख ३८ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५, ३३१ (३) ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



कोठला भागात पत्र्याच्या शेडमध्ये जुगार अड्ड्यावर छापा टाकून जुगार खेळणाऱ्या २० जणांना पकडल्या नंतर त्यांच्या समवेत पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे व पथक.

# कोठला भागात पत्र्याच्या शेडमध्ये जुगार अड्ड्यावर छापा

नगर – शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे हे पथकासह रात्री आस्थापना बंद करत असताना शहरातील कोठला परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून सुमारे १ लाख ३० हजार ३०० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत तिरट नावाच्या हार–जीताच्या जुगारात सहभागी असलेल्या २० जणांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांचे मार्गदर्शनाखाली कोठला परिसरात कुरेशी हॉटेलच्या पाठीमागे पत्र्याचे शेडमध्ये ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईत पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, स.पो.नि. गणेश वारुळे, पोलिस अंमलदार गणेश चव्हाण, सचिन मिरपगार, सुजय हिवाळे, इनामदार, रमेश शिंदे, कदम आणि आर.सी.पी. पथक सहभागी झाले होते.

# उमेद प्रकल्पातून महिला स्वावलंबनाकडे ठोस पाऊल

नगर – महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देणारा आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस बळ देणारा प्रेरणादायी उपक्रम स्नेहालय संचलित मलाला बालभवन व उत्कर्ष बालभवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात एकल महिलांना प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम पार पडला. उमेद प्रकल्पांतर्गत जनशिक्षण संस्थेच्या शासकीय मान्यताप्राप्त केंद्रातून ब्युटी पार्लर प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ४० गरजू महिलांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आयोजित पालक सभा हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

### मलाला व उत्कर्ष बालभवनात पालक सभेत ब्युटी पार्लर प्रशिक्षण प्रमाणपत्रांचे वाटप



महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देणारा आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस बळ देणारा प्रेरणादायी उपक्रम स्नेहालय संचलित मलाला बालभवन व उत्कर्ष बालभवन येथे एकल महिलांना प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम पार पडला.

अहिल्यानगर वन स्टॉप सखी केंद्राच्या जिल्हा समन्वयक सौ. शबाना शेख यांच्या हस्ते महिलांना प्रशिक्षण पूर्णतेची प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमास रुबीना शेख, यास्मिन शेख, साजेद शेख, रजिया दफेदार यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

पालक सभेदरम्यान विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती, शिस्त, अभ्यासातील प्रगती व पालकांची जबाबदारी यावर मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या मार्गदर्शन वर्गांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून शैक्षणिक निकालात सकारात्मक बदल होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

प्रमाणपत्र वितरण प्रसंगी महिलांना गुणवत्तापूर्ण कौशल्य विकासाचे महत्त्व सांगण्यात आले. केवळ प्रशिक्षण घेणे नव्हे, तर त्या कौशल्याच्या आधारे सातत्यपूर्ण व दर्जेदार सेवा देऊन आर्थिक स्वावलंबन साधता येते, असा संदेश देण्यात आला. बचत गटांचे फायदे, स्वयंरोजगारासाठी आवश्यक प्रक्रिया, उद्यम कार्ड, शॉप अॅक्ट नोंदणी तसेच विविध शासकीय योजनांची माहिती महिलांना देण्यात आली. या उपक्रमामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढला असून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींबाबत त्यांना स्पष्ट दिशा मिळाली. पालकांचा सक्रिय सहभाग, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयी वाढलेली जागरूकता आणि महिलांसाठी उपलब्ध प्रशिक्षण व योजना यांचा सकारात्मक समन्वय साधत मलाला व उत्कर्ष बालभवन समाजपरिवर्तनाचे प्रभावी केंद्र ठरत असल्याचे या कार्यक्रमातून अधोरेखित झाले.





वांबोरी येथील अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक प्रशालेत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाले.

# विद्यार्थी केंद्रित शिक्षण काळाची गरज

### छायाताई फिरोदिया यांचे प्रतिपादन

नगर – शालेय जीवन हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा व संस्कारक्षम असा भाग आहे. आजच्या आधुनिक जगामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थातच आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा प्रभाव वाढत आहे, त्याचा विद्यार्थ्यांनी सदुपयोग करावा. आधुनिक माध्यमांचा विद्यार्थ्यांनी ज्ञानासाठी वापर करावा. सोशल मीडियाच्या आभासी दुनियापासून विद्यार्थ्यांनी दूर राहून आपल्या जीवनात ध्येय मिळवण्यासाठी कष्ट व मेहनत घ्यावी असे आवाहन अ.ए.सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले.

राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक प्रशालेत आयोजित केलेल्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभानिमित्त केलेल्या प्रास्ताविकात यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख अध्यक्षस्थानी सीमाताई मुनोत होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून बाल साहित्यिक सचिन चोभे उपस्थित होते. शाळा समितीचे चेअरमन हेमंत मुथा, सल्लागार मंडळाच्या सदस्य सुनीताताई मुथा, शाळा समिती सदस्य अंचलाताई झंवर उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षा सीमाताई मुनोत आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, शाळा व पालक विद्यार्थ्यांना संस्कार देते. विद्यार्थ्यांनी जीवनात कितीही मोठे झाले तरी अहंकार दूर ठेवावा. आपल्या गुरुप्रती व शाळेप्रती सदैव आस्था ठेवून जीवनात नम्रता ठेवावी.

यावेळी प्रमुख अतिथी सचिन चोभे म्हणाले की, विद्यार्थ्यांची नजर ही शोधक हवी, विद्यार्थ्यांनी कम्फर्ट झोन मधून बाहेर यावे. या कम्फर्ट झोन मधून बाहेर पडल्याशिवाय प्रगती शक्य नाही याची जाणीव विद्यार्थ्यांनी सदैव ठेवावी. जिद्द, इच्छाशक्ती, सकारात्मकता, आत्मविश्वास आणि विचारशक्ती जर मजबूत असेल तर कोणतीही मर्यादा आपणास अडथळा ठरत नाही. एव्हरेस्ट पर्वत चढणे अवघड नाही मात्र पहिले पाऊल टाकणे महत्वाचे आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

सरस्वती पूजन, ईशस्तवन व स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अ. ए. सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले. शाळा समितीचे चेअरमन हेमंत मुथा यांनी स्नेहसंमेलननिमित्त सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. अहवाल वाचन मुख्याध्यापिका वनिता गोत्राळ यांनी केले तर अध्यक्ष व अतिथींचा परिचय विद्यार्थी प्रतिनिधी आर्यन गवते आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी ओवी घोगरकर यांनी मुलाखतीतून घेतला

यावेळी विविध स्पर्धेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. लोकगीते, विविध प्रकाराचे नृत्याविष्कार विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहात साजरे केले. महाराष्ट्राच्या विविध लोककलेचा अविष्कार सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

याप्रसंगी वार्षिक अहवाल वाचन प्रशालेच्या मुख्याध्यापिका वनिता गोत्राळ यांनी केले. शिक्षक प्रतिनिधी प्रसाद शिंदे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन उर्मिला शिंदे, वैशाली सोनार यांनी केले. बक्षीस पात्र विद्यार्थ्यांची यादी वाचन मुकुंद पालवे यांनी केले

# आदर्श गोसेवक पुरस्काराने भरत बोरुडे यांचा सन्मान

नगर – चौपाटी कारंजा मित्र मंडळाच्या वतीने भरत बोरुडे यांना आदर्श गोसेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हभप गोविंद जाटदेवळेकर महाराज यांच्या हस्ते या पुरस्काराचे नुकतेच वितरण झाले. गोसेवक भरत बोरुडे हे अहिल्यानगर शहरातील सतनाम साक्षी गोशाळेत गेल्या अनेक वर्षांपासून नि:स्वार्थपणे सर्वप्रकारची सेवा देत आहेत. यावेळी मंडळाचे अध्यक्ष महेश कुलकर्णी, उपाध्यक्ष सुचित भळगट, सचिव अमोल भंडारे आदींसह सदस्य व नागरिक उपस्थित होते.

हभप गोविंद जाटदेवळेकर महाराज म्हणाले, गोसेवा ही ईश्वर सेवा समान आहे. आपल्या भारतीय परंपरेत गोसेवेला अनन्यसाधारण महत्व आहे. आजच्या धावपळीच्या युगात स्वार्थ बाजूला ठेवून समाजासाठी काम करणारी माणसे दुर्मिळ होत चालली आहेत. अशा परिस्थितीत भरत बोरुडे यांची नि:स्वार्थपणे सुरू असलेली गोसेवा सर्वांसाठी प्रेरणादायी व अनुकरणीय ठरत आहे. मंडळाचे ही कार्य कौतुकास्पद असून त्यांनी योग्य व्यक्तीला उचित पुरस्कार दिला आहे.

प्रास्ताविकात महेश कुलकर्णी यांनी मंडळाच्या सामाजिक, आध्यात्मिक व धर्माच्या कार्याची माहिती दिली. या पुरस्कार वितरण सोहळ्यास मंडळाचे सदस्य अॅड.उमेश नगरकर, हभप प्रभाताई भोंग, महेंद्र ताकपिरे, पराग देशमुख, तेजस वैद्य, प्रदीप बोज्ञा, सागर रोहकले, मनीष भंडारे, महेश दिवाने, पुरुषोत्तम बुरसे, उदय नगरकर, अर्णव नगरकर, सुरेंद्र सोनवणे, सोमनाथ मुळे , राहुल वरखेडकर, प्रकाश देशमुख, आर्यन दिवाने, नील गांधी व कृष्णा तावरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



चौपाटी कारंजा मित्र मंडळाच्या वतीने भरत बोरुडे यांना आदर्श गोसेवक पुरस्कार देऊन सन्मानित करताना हभप गोविंद जाटदेवळेकर महाराज.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

